## ‘गुजरात दंगलप्रकरणी पंतप्रधान मोदींवरील आरोप राजकीय सुडातून’



**नवी दिल्ली :** गुजरात दंगलप्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर झालेले आरोप हे राजकीय सुडातून झाले असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एका मुलाखतीत म्हटले आहे. २००२ साली गुजरातमध्ये झालेले दंगे हे सुनियोजित नव्हते; तर स्वप्रेरीत होते. गोध्रामध्ये साबरमती एक्स्प्रेस जाळल्यामुळे दंगल उसळली असल्याचे सांगून शाह पुढे म्हणाले की, झालेले दंगे रोखण्यासाठी लष्कर बोलावण्यात कोणताही दिरंगाई करण्यात आली नव्हती, मात्र दंगलप्रकरणी अनेक खोट्या बातम्या पसरविण्यात आल्या होत्या, तिस्ता सटेलवाड यांच्या एनजीओने चुकीचे आरोप केले होते, जे बिनबुडाचे असल्याचे नंतर सिद्ध झाले आहे. मोदींवर केलेल्या आरोपांना जनतेने स्वीकारले नाही. या आरोपानंतरही मोदी धैर्याने लढले आणि त्यांचे नेतृत्व सोन्यासारखे झळाळून निघाले, असेही शाह यांनी नमूद केले.


रविवार, २६ जून २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक ३३९
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड


### अंतरंग


महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करा : खा. राणा/२

विविध विषयांवरील सदरे, लेख/४, ५, ६

रणजी ट्रॉफी : मध्य प्रदेशची फायनलवर मजबूत पकड/८


# ‘मविआ’तील घटक पक्षांकडून शिवसेनेचे खच्चीकरण

## ना. एकनाथ शिंदेंचा हल्लाबोल; सुरक्षेवरून वरिष्ठ नेत्यांना इशारा

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

गेल्या अडीच वर्षांत महाविकास आघाडीतील घटक पक्षांकडून शिवसेनेचे खच्चीकरण करण्यात येत आहे, असा हल्लाबोल शिवसेना नेते ना. एकनाथ शिंदे यांनी केला आहे.

ना. शिंदे एक पत्र ट्वीट करीत म्हणाले की, मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांच्या आदेशाने राजकीय आकसापोटी आमच्या ३८ आमदारांचे संरक्षण काढून घेण्यात आले आहे. आम्ही विद्यमान आमदार आहोत. तरीही प्रोटोकॉलप्रमाणे आम्हाला आणि आमच्या कुटुंबीयांना दिलेली सुरक्षा बेकायदेशीरपणे काढण्यात आली आहे. हे राजकीय सुडापोटी केले जात आहे. याचा वापर करून काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या गुंडांचा सहभाग असलेल्या महाविकास आघाडीच्या मागण्या मान्य करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

आम्हाला सुरक्षा देण्याचे कारण आमच्या जीवाला असलेला धोका आहे. आम्ही कोणत्या बाजूचे राजकारण करतो यावरून सुरक्षा देण्याचा निर्णय होत नाही. असे असले तरी ज्या धोक्यामुळे आम्हाला महाराष्ट्र सोडावा लागला तेच आता महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या या कृतीने सिद्ध झाले आहे, असा आरोप शिंदे यांनी या पत्रात केला आहे.

या पत्रात शिंदे यांनी पुढे म्हटले आहे की, पोलीस सुरक्षा काढून आमच्या आणि कुटुंबीयांच्या सुरक्षेशी तडजोड केली जात आहे. सोबतच मविआचे नेते आपापल्या पक्षातील कार्यकर्त्यांना आमच्यावर हल्ला करण्यासाठी चिथावणी देत आहेत.



संजय राऊत यांनी महाराष्ट्र सोडणाऱ्या आमदारांना पुन्हा येणे आणि फिरणे अवघड जाईल या केलेल्या वक्तव्यानंतर आणि आमदारांची सुरक्षा काढल्यानंतर काही वेळातच आमच्या दोन सदस्यांच्या कार्यालयांची तोडफोड करण्यात आली आहे. असाच महत्त्वाच्या व्यक्तींची सुरक्षा काढून घेण्याचा प्रकार पंजाबमध्येही झाला होता. त्यानंतर तेथे या व्यक्तींना गुंडांनी लक्ष्य केल्याचे समोर आले. महाराष्ट्रातील आमदारांची सुरक्षा काढण्याचे असेच परिणाम होतील.

प्रोटोकॉलप्रमाणे आम्हाला व आमच्या कुटुंबीयांना जी सुरक्षा द्यायला हवी ती तत्काळ द्यावी. आमच्या कुटुंबीयांना कोणतीही इजा झाली, तर त्याला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार, शिवसेना खासदार संजय राऊत, मंत्री आदित्य ठाकरे असे मविआचे नेते जबाबदार राहतील, असा इशारा शिंदेंनी दिला आहे.

दरम्यान, शिंदेंच्या पत्रानंतर राज्यातील कोणत्याही आमदाराचे संरक्षण काढण्याचे आदेश मुख्यमंत्री वा गृहविभागाने दिलेले नाहीत, असा दावा राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी केला आहे.

## आम्ही शिवसेनेतच -आमदार दीपक केसरकर

**गुवाहाटी :** आम्ही अजूनही शिवसेनेत आहोत. आम्ही इकडे आलेल्या आमदारांपैकी कोणीही पक्ष सोडलेला नाही. महाराष्ट्रात आमची कार्यालये फोडली जात आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील परिस्थिती बदलेल तेव्हा आम्ही मुंबईत येऊ, असे बंडखोर शिवसेना नेते व मंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने आमदार दीपक केसरकर यांनी शनिवारी (दि. २५) पत्रकारांशी संवाद साधताना स्पष्ट केले.

आमदार केसरकर पुढे म्हणाले, उद्धव ठाकरेंना आम्ही अनेक वेळा सुचविले होते की, आपण ज्यांच्यासोबत आहोत त्यांच्यासोबत राहू नये. आपल्या पक्षाची अधोगती होत आहे. अनेक जणांनी ही गोष्ट त्यांना सांगितली



होती, पण तरीदेखील त्यांनी याकडे लक्ष दिले नाही. एवढे लोक सांगतात म्हणजे त्यामध्ये तथ्य आहे ना? मात्र दुर्लक्ष करण्यात आले.

आमचा नेता बदलण्याचा मुंबईत विषय झाला तो आम्हाला मान्य नाही. आमचा नेता हा एकनाथ शिंदेच असतील आणि आहेत. बाळासाहेबांचा विचार मांडण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. आमच्या गटाचे नाव अजून ठरलेले नाही. शिवसेनेच्या तिकिटावर आम्ही निवडून आलो आहोत. घटनात्मक तरतुदीनुसार दोन तृतीयांश सदस्य आमच्याकडे आहेत. त्यामुळे आम्ही ‘फ्लोअर टेस्ट’ला केव्हाही तयार आहोत. आमच्याकडे बहुमत आहे, असे केसरकर यांनी सांगितले.

जेव्हा आम्ही आमदार इकडे आलो तेव्हापासून महाराष्ट्रात वेगळे चित्र निर्माण झाले आहे. लोकांना रस्त्यावर उतरण्याचे आवाहन केले जाते आहे. हे चुकीचे आहे. कोणीही रस्त्यावर उतरण्याची गरज नाही, असेही आमदार केसरकर म्हणाले.

## शिंदे गटाचे ठाण्यात शक्तिप्रदर्शन

**ठाणे :** शिवसेना नेते व मंत्री एकनाथ शिंदे यांच्या समर्थकांनी शनिवारी (दि. २५) ठाण्यात जोरदार शक्तिप्रदर्शन केले. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ना. एकनाथ शिंदे यांच्या घराबाहेर समर्थकांची गर्दी झाली होती. या वेळी समर्थकांनी शिंदे यांना आपला पाठिंबा असल्याचे दाखवून दिले.

**(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

## आमदार भरत गोगावलेंच्या समर्थनार्थ महाडमध्ये शिवसेना पदाधिकारी एकवटले

### स्थानिक स्तरावर वाढता पाठिंबा



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

शिवसेना नेते व मंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्षनेतृत्वाविरुद्ध केलेल्या बंडामध्ये महाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार भरत गोगावले हेही सहभागी झाले आहेत. त्यांच्या समर्थक पदाधिकाऱ्यांनी शनिवारी (दि. २५) घेतलेल्या बैठकीत आमचा पाठिंबा भरतशेठलाच, असा एकमुखी निर्धार केला.

शिवसेना आमदार भरत गोगावले यांच्या शिवनेरी निवासस्थानी पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीस शिवसेनेचे महाड तालुकाप्रमुख सुरेश महाडिक, विजय सावंत, माजी सभापती विजय धाडवे, सपना मालुसरे, तालुका संपर्कप्रमुख रवींद्र तरडे आदी पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीला सुमारे ३०० पदाधिकारी उपस्थित होते. तीन वेळा आमदार झालेल्या गोगावले यांना महाविकास आघाडीत मंत्रिपद मिळेल अशी आशा महाडकर नागरिकांना होती, मात्र त्यांना मंत्रिपासून दूर ठेवून राष्ट्रवादीला मंत्रिपद दिल्याच्या राग या वेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यात वारंवार निधीवाटपातदेखील शिवसेनेला कायम मागे ठेवले जात होते. त्यातच आमदार भरत गोगावले यांच्याकडून केल्या जाणाऱ्या कामांचे श्रेय लाटण्याचे काम पालकमंत्री करीत असल्याचे तालुकाप्रमुख सुरेश महाडिक यांनी म्हणत आम्ही कायम आमदार भरत गोगावले यांच्यासोबत असल्याचे स्पष्ट केले, तर शिवसेना संपविण्याचे काम काँग्रेस-राष्ट्रवादी करीत असल्याचा आरोप या वेळी जिल्हा परिषद सदस्य मनोज काळीजकर यांनी केला.

### निवडक

#### मुंबई दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार साजिद मीरला अटक

**इस्लामाबाद :** २६/११च्या मुंबई दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार साजिद मीर याला पाकिस्तानात ताब्यात घेण्यात आल्याचे वृत्त समोर आले आहे. एफबीआयने मीरला फरार दहशतवादी घोषित केले होते. गंभीर म्हणजे यापूर्वी पाकिस्तानने तर साजिद मीरचा मृत्यू झाल्याचा दावा केला होता.

#### तिस्ता सेटलवाड एटीएसच्या ताब्यात; मुंबईत कारवाई

**मुंबई :** गुजरात एटीएसच्या पथकाने शनिवारी (दि. २५) सामाजिक कार्यकर्त्या तिस्ता सेटलवाड यांना त्यांच्या एनजीओशी संबंधित एका प्रकरणात ताब्यात घेतले आहे. सेटलवाड यांना मुंबईतील राहत्या घरातून ताब्यात घेऊन सांताक्रूझ पोलीस ठाण्यात आणण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने झाकिया जाफरी यांची याचिका फेटाळून लावताना सेटलवाड यांच्या एनजीओची चौकशी करण्याची मागणी केली होती. त्यानंतर एटीएसने ही कारवाई केल्याचे समजते.

## आमदार तानाजी सावंत यांना मराठा क्रांती ठोक मोर्चाचे समर्थन

### कार्यालयात तोडफोड झालेल्या ठिकाणी वाहिली फुले



**पुणे : प्रतिनिधी**

मराठा क्रांती ठोक मोर्चाने शिवसेनेचे बंडखोर आमदार तानाजी सावंत यांना पाठिंबा दर्शविला आहे. शिवाय शनिवारी (दि. २५) शिवसैनिकांकडून तानाजी सावंत यांच्या कार्यालयाची तोडफोड करण्यात आल्यानंतर मराठा क्रांती ठोक मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी त्या ठिकाणी जाऊन फुलेदेखील वाहिली आहेत.

शिवसेना नेते आणि राज्याचे नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी बंड पुकारले आहे. त्यांनी आपल्यासोबत ४०पेक्षा अधिक आमदार असल्याचा दावा केला असून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडी सरकारमधून बाहेर पडावे, अशी मागणी केलेली आहे. यामुळे शिवसैनिकांनी शिंदे आणि बंडखोर आमदारांविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. शिवसेनेचे बंडखोर आमदार तानाजी सावंत यांचे पुण्यातील मे. भैरवनाथ शुगर वर्क्स लि.चे कार्यालय माजी नगरसेवक विशाल धनवडे यांच्यासह शिवसैनिकांनी फोडले. या घटनेनंतर मराठा क्रांती ठोक मोर्चातील कार्यकर्त्यांनी तानाजी सावंत यांना समर्थन देत या हल्ल्याचा निषेध नोंदवला.

या वेळी मराठा क्रांती ठोक मोर्चा समन्वयक महेश डोंगरे म्हणाले की, तानाजी सावंत यांच्या साखर कारखान्याच्या कार्यालयावर आज जो भ्याड हल्ला झाला त्या घटनेचा आम्ही सर्वजण निषेध व्यक्त करतो. एवढी घटना होऊनदेखील तानाजी सावंत यांनी शांततेत राहण्याचे आवाहन केले आहे, पण येणाऱ्या काळात तुम्ही तारीख, वार आणि वेळ सांगा, आम्हीदेखील जशाच तसे उत्तर देण्यास समर्थ आहोत, असा इशाराही त्यांनी या वेळी दिला.

### ‘दिबां’च्या स्मृतिदिनानिमित्त भजन संध्या

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते वारकरी संप्रदायातील मान्यवरांचा सत्कार


**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे दैवत लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या नवव्या स्मृतिदिनी शुक्रवारी (दि २४) आगरी समाज मंडळाच्या पनवेल येथील महात्मा फुले सभागृहात गायिका गीता सुभाष म्हात्रे व सीमा प्रकाश पराड (बडेकर) यांची भजन संध्या आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमात वारकरी संप्रदायातील मान्यवरांचा प्रमुख पाहुणे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास कामगार नेते महेंद्र घरत, उद्योगपती जे. एम. म्हात्रे, १९८४च्या आंदोलनातील रणरागिणी भारतीताई पवार तसेच प्रीतम म्हात्रे, दर्शना भोईर आदी उपस्थित होते.



या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या कार्यक्रमाबद्दल मनोगतात गौरवोद्गार काढले. सर्व मान्यवर सत्कारार्थींनी समाजासाठी दिलेले योगदान थोर आहे. एकनाथ पाटील सीए असून त्यांचे आध्यात्मिक कार्य बहुमोल आहे. अरुणबुवा कारेकर यांनीही संगीत क्षेत्रात, शिल्पकलेत उंची गाठली आहे. ह.भ.प. विनायक महाराज यांचे वडील ब्रह्मलीन बाळाराम महाराज कांबेकर यांनी स्थापन केलेल्या श्रीक्षेत्र भंडारा डोंगरावरील मंदिर व विद्यापीठ परिसरात मी महाराज असताना तीन-चार वेळा गेलो आहे. निवृत्तीबुवा चौधरी यांनी अनेक शिष्यगण घडविले. या मंडळींमुळे वारकरी संप्रदायाचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात झाला आहे. मी आगरी समाज मंडळाच्या कार्यकारिणीला त्यांनी या मान्यवरांचा जो सत्कार घडवला व तो माझ्या हस्ते केला त्याबद्दल धन्यवाद देईन. मंडळाचे कार्य हे संस्थापक अध्यक्ष दि. बा. पाटीलसाहेब यांच्या शिकवणीनुसार चालत आहे, असेही ते म्हणाले. **(पान २ वर..)**



**पनवेल : पावसाला सुरुवात झाल्याने कर्नाळा किल्ल्याचे निसर्गसौंदर्य खुलू लागले आहे. सध्या पावसाने उसंत घेतली आहे. असे असले तरी वर निळ्या आकाशात पांढरेशुभ्र ढग आणि खाली किल्ल्याचा हिरवागार परिसर लक्ष वेधून घेत आहे. त्याची छायाचित्रकार लक्ष्मण ठाकूर यांनी टिपलेली छबी.**

## मुंबईत १० जुलैपर्यंत जमावबंदीचे आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात राजकीय वातावरण तापल्याने मुंबईत कायदा व व्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांनी १० जुलैपर्यंत जमावबंदी लागू केली आहे. या संदर्भात मुंबई पोलिसांनी परिपत्रक जारी केले आहे.

सध्याच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील सर्व अपर पोलीस आयुक्त व पोलीस उपायुक्त यांची बैठक झाली. यानुसार मुंबईतील सर्व राजकीय पक्षांची कार्यालये, मंत्री, खासदार, आमदार व महत्त्वाचे नगरसेवक यांची कार्यालये, निवासस्थाने या ठिकाणी बंदोबस्त तैनात करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे सध्या चालू असलेले राजकीय कार्यक्रम, बैठका या ठिकाणी बंदोबस्त ठेवण्याबाबत सांगण्यात आले आहे. विशेष शाखेने सोशल मीडियावर लक्ष ठेवून संबंधितांना आवश्यक माहिती त्वरित देण्यास सांगितले आहे. स्थानिक ठिकाणी संभाव्य राजकीय हालचालींबाबत माहिती घेऊन योग्य कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांच्या परित्रकात म्हटले आहे.

## फणसाड अभयारण्यात शिकारीस आलेल्या सात जणांना पकडले

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील फणसाड अभयारण्यात वन्यजीवांची शिकार करण्यासाठी आलेल्या सात जणांना पकडण्यात आले आहे. या सर्वांना मुरूड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्यासमोर हजर केले असता त्यांना तीन दिवसाची वन कोठडी सुनावण्यात आली आहे.

मुरुडपासून १४ किलोमीटर अंतरावर असलेल्या फणसाड अभयारण्यात विविध वन्यजीव आणि वृक्षसंपदा आहे. येथे रात्रीच्या समयी वन्यजीवांची शिकार करण्यासाठी २४ जून रोजी सात जण आले होते. यामध्ये मंगेश विष्णू वाघमारे (वय २५), सोमनाथ गजानन वाघमारे (२३, दोघेही रा. बेलीवाडी) मच्छिंद्र दशरथ वाघमारे (२६, सुमरादेवी), दीपक मनोज पाटील (१८), प्रथमेश प्रकाश ठाकूर (२१, दोघेही रा. शिरगाव), चेतन भास्कर खानावकर (२५) व प्रज्वल हेमंत रोटकर (२२, दोघेही रा. साळाव) यांचा समावेश होता. शिकारीसाठी आलेल्या या लोकांना टेहळणी करताना फणसाड अभयारण्य प्रशासनातील कर्मचारीवृंदाने पकडले. त्यांच्याकडून दोन ठासणीच्या बंदुका, जिवंत दारुगोळा, तीन मोटरसायकली, तीन बॅटऱ्या, पाच मोबाइल ताब्यात घेण्यात आले आहेत.

### तीन दिवसांची वन कोठडी



ठाणे विभाग उपवनसंरक्षक सरोज गवस व सहाय्यक वनसंरक्षक नंदकुमार कुप्ते यांच्या मार्गदर्शनाखाली फणसाड अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी तुषार काळभोर व कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली. अभयारण्य प्रशासनाने या सातही जणांवर गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे.

# मनात धुसफूस होती, त्याचाच हा विस्फोट!

## खासदार शिंदे यांचे प्रतिपादन; मंत्री एकनाथ शिंदे समर्थकांकडून ठाण्यात शक्तिप्रदर्शन

**मुंबई: प्रतिनिधी**

शिवसेना नेते तथा मंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर त्यांच्या समर्थनार्थ ठाणे जिल्ह्यात शनिवारी सायंकाळी शिंदे यांच्या लुईसवाडी निवासस्थानाबाहेर शिंदे समर्थकांकडून मोठ्या प्रमाणात शक्तिप्रदर्शन करण्यात आले. दरम्यान, या वेळी एकनाथ शिंदे यांचे पुत्र आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी भाषण करत बंडखोर आमदारांचे समर्थन करताना मनामध्ये जी धुसफूस होती, त्याचा हा विस्फोट झाला आहे. यावेळी माजी महापौर नरेश म्हस्के यांनीही विचार व्यक्त केले.

गेले तीन चार दिवस आपण पाहत आहात की कशा प्रकारे या घडामोडी घडत आहेत. आज मोठ्या संख्येने एकनाथ शिंदेंच्या बरोबर उभे राहण्यासाठी तुम्ही इथे उपस्थित राहिलात. ठाण्यासोबत बाहेरही एकनाथ शिंदे यांनी जे काम केले त्यासाठी त्यांना लोकांनी समर्थन दिले. आजही एकनाथ शिंदे हे आपण शिवसैनिक असल्याचेच म्हणत आहेत. महाराष्ट्रात मोठी घडामोड घडली आहे. एकनाथ शिंदेंसोबत आज शिवसेनेचे ४० आणि १० अपक्ष आमदार आहेत. मला वाटतं इतिहासातील ही पहिली घटना असेल की इतक्या मोठ्या संख्येने आमदारांनी एकनाथ शिंदे यांच्यावर विश्वास दाखविला. यासाठी काहीतरी कारण आहे. मनामध्ये जी धुसफूस होती, त्याचा हा विस्फोट झाला आहे. लोक इतक्या संख्येने इथे उपस्थित का आहेत हा विचार



करण्यासारखा प्रश्न आहे, असे श्रीकांत शिंदे म्हणाले.

अडीच वर्षे जी अनैसर्गिक आघाडी झाली त्यातून आपण बाहेर पडले पाहिजे असे का वाटले? यामध्ये कोणाचा तरी दोष असेल. यांच्याबद्दल विचार झाला पाहिजे. गेल्या अडीच वर्षात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे नेतृत्त्व करत आहेत. आमचे मुख्यमंत्री आहेत म्हणून कार्यकर्त्यांना चांगले दिवस येतील अशी अपेक्षा होती. शिवसेना प्रमुखांनी आम्हाला शिवसंपर्क अभियानासाठी पाठवले होते. कार्यकर्त्यांची कामे होत आहेत की नाहीत, हे जाणून घेण्यासाठी त्यांनी आम्हाला पाठवले होते. सातार्‍यात गेल्यावर आम्हाला निधी मिळत नाही हे तिथल्या आमदारांचे रडगाणे होते. आम्हाला निधी मिळाला तरी तो थांबविण्याचे काम राष्ट्रवादीचे मंत्री करतात. अशावेळी आम्ही काम कसे करायचे ते म्हणाले. सत्तेमध्ये असून आमच्यावर अन्याय होत असेल तर त्याचा फायदा काय? हे आम्ही वारंवार सांगण्याचा प्रयत्न केला, असेही श्रीकांत शिंदे म्हणाले.

कार्यकर्त्यांचा जीव आघाडीमध्ये घुसमटत आहे असेही आम्ही सांगितले. सातार्‍यामध्ये साखर कारखान्यांवर राष्ट्रवादीचे वर्चस्व आहे. शिवसैनिकाला तिथे उस न्यायचा असेत तर कुठल्या पक्षाचा आहेस असे विचारले जाते आणि त्यानंतर उस घेतला जातो. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचा उस असेल तर लागेल तर घेतला जातो नाहीतर त्याला तो जाळावा लागतो. गेल्या अडीच वर्षामध्ये इतिहासात कधी शिवसेनेसोबत इतका असंतोष झाला नव्हता तो सत्तेत आल्यापासून झाला आहे. याचा विचार व्हायला पाहिजे होता, असेही खासदार शिंदे म्हणाले. ठाण्यात वेगळी परिस्थिती आहे. इथे कधी दुसर्‍या पक्षाच्या कार्यकर्त्यांची गळचेपी कधी केली नाही. कोविड काळात सगळ्या पक्षाच्या नगसेवकांना निधी देण्याचे काम पालकमंत्री एकनाथ शिंदें यांनी केले. हा आघाडी धर्म आहे. पण शिवसेनेला दाबण्याचे काम राष्ट्रवादीकडून झाले आहे, असा चक्क आरोप श्रीकांत शिंदे यांनी केला आहे.

## नवी मुंबईतील उद्यानाच्या लोखंडी जाळ्या अज्ञाताने तोडल्या

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत कोरोनाची संख्या वाढत आहे. कोरोना रुग्ण संख्या वाढू नये यासाठी शासन पूर्णपणे खबरदारी घेत आहे. विशेष करून नवी मुंबईतील सार्वजनिक उद्यान, बगीचे दुपारी पूर्णतः बंद असतात. मात्र उद्यानातील सुरक्षा रक्षकांच्या बेफिकिरीमुळे काही उद्याने सर्‍हास उघडी असतात. या उद्यानात टवाळखोरांचा वावर दिसून येत आहे. नेरुळ येथील सेक्टर ३मधील चाचा नेहरू उद्यानातील लोखंडी जाळी अज्ञाताने गायब केली आहे.

अधिक वृत्त असे, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईत उद्याने सकाळी व संध्याकाळी पाच ते नऊ अशा वेळेत सुरू करण्याची परवानगी दिली आहे, मात्र नेरुळमधील हे उद्यान सताड उघडे असल्याने काही टवाळखोर, प्रेमी युगल उद्यानात बसलेले दिसून येत आहेत. उद्यानाच्या सुरक्षिततेची चावी ज्यांच्या हातात ते सुरक्षा रक्षकही उद्यानात गैरहजर आढळून येत आहेत. या समस्येवर कारवाई व्हावी अशी मागणी नागरिक करत आहे. उद्यानाची संरक्षण लोखंडी जाळी अज्ञातांनी गायब केली आहे. विशेष म्हणजे मनपा आयुक्त अभिजित बांगर यांनी उद्यान दुपारी बंद ठेवायचे आदेश देऊनही आयुक्तांच्या सूचनांचे पालन होत नसल्याचे दिसते.

**नवी मुंबईतील उद्यान दुपारी बंद असल्याचे सूचना फलक लावले आहेत. दिवसभर उद्यान उघडी असतील तर त्याबाबत माहिती घेतो. सुरक्षा रक्षकांच्या हजेरीबाबत त्वरीत माहिती घेऊन पुढील कारवाई करण्यात येईल.**

**–जयदीप पवार, मनपा उपायुक्त (उद्यान विभाग) नवी मुंबई**

# आगे आगे देखो होता है क्या!

## महाराष्ट्रातील राजकीय स्थितीवर ना. नितीन गडकरींचे वक्तव्य

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना विधिमंडळ पक्षातील बहुतांश आमदार गुवाहाटीत आल्याने आवश्यक संख्याबळ पूर्ण झाले आहे, असा दावा शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी केला आहे. त्यानंतर आता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राज्यातील राजकीय भूकंपावर प्रतिक्रिया दिली आहे. लवकरच परिस्थिती स्पष्ट होईल, असे सूचक वक्तव्य नितीन गडकरी यांनी केले आहे. आगे आगे देखो होता है क्या, असेही गडकरींनी म्हटले आहे.



गडकरी पुढे म्हणाले, मला वाटते की, महाराष्ट्रावरील संकट लवकरच दूर होईल. आजच्या समस्येमध्येच उद्याचे उत्तर लपलेले असते. लवकरच याबाबत सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळतील. लवकरच परिस्थिती स्पष्ट होईल. अंधार निघून जाईल आणि सूर्य उगवेल. वैयक्तिक संबंध हे राजकारणापेक्षा वेगळे असतात. ते सरकारमध्ये असोत किंवा नसोत संबंध तेच राहतात. राजकारण वेगळे असते, असे नितीन गडकरी यांनी म्हटले आहे. उद्धव ठाकरेंनी भाजपला सोडून काँग्रेस, राष्ट्रवादीसोबत जाण्याचा निर्णय घेतला. काही त्यांच्या गोष्टी आहेत, तर काही आमच्याही आहेत. हे सुरुच राहणार आहे. भाजप आणि शिवसेना एकत्र आली तर मला आनंद होईल, पण आज ती परिस्थिती खूप लांब असल्याचे दिसत आहे. पुढे काय आहे हे देवालाच माहिती असेल. याचे उत्तर येणारा काळच देईल, असेही नितीन गडकरी म्हणाले.

## ट्रेलर–मोटरसायकल अपघातात एक जखमी

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गावर उचेडे गावच्या हद्दीत पुढे जाणार ट्रेलर अचानक मागे आल्याने या अपघातात मोटार सायकलस्वार जखमी झाला आहे.

अधिक वृत्त असे, यातील फिर्यादी रा. चिकणी पोस्ट पाटणसई ता.रोहा हे त्यांच्या मोटार सायकलने गुरुवारी सायंकाळी ७.५५ वा.च्या सुमारास मुंबई गोवा हायवेने जात होते. उचेडे गावच्या हद्दीतील गुंजन हॉटेलच्या जवळ चढणीवर समोरुन जाणारा ट्रेलर अचानक मागे आला. या ट्रेलरची मोटारसायकलची धडक बसली. या अपघातात फिर्यादी हे मोटारसायकलसह खाली पडले. त्याच्या डोक्याला डाव्या साईडला व डाव्या खांद्याला मार लागुन ते जखमी झाले. अपघातात मोटार सायकलचेही नुकसान झाले. याबाबत पेण पोलीस ठाण्यात भा.दं.वि.कलम २७९,३३७,३३८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस नाईक कौशिक फेंगडू हे करीत आहेत.

# महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करा

## खासदार नवनीत राणा यांची मागणी

**अमरावती : प्रतिनिधी**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे सच्चे कार्यकर्ते असणारे शिवसैनिक, आमदार हे उद्धव ठाकरे यांना सोडून एकनाथ शिंदे यांच्या गटात गेले असताना त्यांच्या कुटुंबाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या सर्व कुटुंबांना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सुरक्षा पुरवावी. तसेच महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट आणली जावीअशी मागणी अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांनी केली आहे. खासदार राणा यांनी यापूर्वीदेखील अनेकदा महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट आणावी, अशी मागणी केली होती.

नवनीत राणा यांनी एक चित्रफीत प्रसारित करून, बंडखोर शिवसेना आमदारांच्या कुटुंबीयांना पाहून घेण्याची धमकी दिल्याबद्दल संजय राऊत यांच्यावर टीका केली आहे. संजय राऊत यांनी सर्वसामान्य व्यक्तींना धमकावण्याचा प्रकार योग्य नाही. त्यांच्या या वक्तव्याची दखल घेऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेलेल्या आमदारांच्या कुटुंबीयांना संरक्षण द्यावे, असे खासदार राणा यांनी म्हटले आहे. उद्धव ठाकरे यांच्या गुंडांकडून शिवसेनेशी बंडखोरी करणाऱ्या खऱ्या शिवसैनिकांच्या घरावर, कार्यालयावर हल्ले करण्याचा



प्रकार महाराष्ट्रात सुरू असून यावर त्वरित आळा घालण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लक्ष द्यावे, असेदेखील खासदार राणा यांनी म्हटले आहे. तसेच ज्या दिवशी काँग्रेससोबत जाण्याची वेळ येईल त्याचक्षणी शिवसेनेचे दुकान बंद, असे वक्तव्य शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे करायचे. याचीही आठवण खासदार राणा यांनी करुन दिली.

## महाड ग्रामीण रुग्णालयात दिव्यांगांची तपासणी

### प्रमाणपत्रांचे वाटप

**महाड : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महाड ग्रामीण रुग्णालयात शुक्रवार (दि. २४) पासून महाड आणि पोलादपूर तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींची तपासणी आणि प्रमाणपत्रांचे वाटप करण्यास सुरुवात झाली.

महाड आणि पोलादपूर तालुक्यात सुमारे ६०० दिव्यांग व्यक्ती आहेत. त्यापैकी २५० लोकांची शुक्रवारी महाड ग्रामीण रुग्णालयात तपासणी करून त्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

महाड ग्रामीण रुग्णालयाचे डॉ.समीर शेलार, डॉ.दीपक अडकमोड तसेच माणगाव उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. शंतनू डोईफोडे, डॉ.तुषार शेठ यांनी दिव्यांग व्यक्तींची तपासणी केली.तर अलिबाग येथील दिव्यांग प्रमाणपत्र विभाग प्रमुख प्रतिमा फडतरे, डॉ. अंकिता करंबळे, सुशील साईकर, ज्ञानदीप भोईर, प्रतिमा सुतार, समाधान चौधरी, गणेश भोसले, रुपेश म्हात्रे, कीर्ती कुंभार, मंगेश म्हात्रे यांनी प्रमाणपत्रांचे वाटप केले.

या वेळी महाडच्या प्रांताधिकारी प्रतिमा पुदळवाड, तहसीलदार सुरेश काशीद, नगरपालिका मुख्याधिकारी महादेव रोडगे, गटविकास अधिकारी भाऊसाहेब पोळ, पोलादपूर ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. भाग्यरेखा पाटील, महाड ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. भास्कर जगताप यांच्यासह तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे डॉक्टर यावेळी उपस्थित होते. दिव्यांगही या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोपरखैरणे येथे शाहू महाराजांवर व्याख्यान



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नवी मुंबईतील कोपरखैरणे शाखेतर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्ताने राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. हे व्याख्यान शुक्रवारी (दि. २४) सकाळी ९ वाजता कोपरखैरणे, सेक्टर ४ मधील विद्यादीप विद्यालयात झाले.

गजानंद जाधव यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक कामाचा आढावा घेताना सांगितले की, समाज धार्मिकतेच्या, अनिष्ट रूढी परंपरांच्या विळख्यात अडकलेला असताना त्याला सकारात्मक परिवर्तनवादनाच्या वाटेवर आणण्याचे काम राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी केले. समाजातील विविध जातींच्या मुलांच्या शिक्षणाला गती यावी म्हणून शिक्षण सक्तीचे केले. समाजातील सर्व घटकांना सुशिक्षीत करून त्यांच्यात सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. आंतरजातीय विवाह व विधवा विवाह नोंदणीसारखे कायदे करून पुरोगामी विचार अमलात आणले. जोगत्या–मुरळ्या प्रतिबंधक कायदा करून धर्माच्या नावाखाली होणाऱ्या शोषणाला पायबंध घातला, अशा समाज सुधारक कायद्यांनी समाजात समता प्रस्थापित होण्यास मदत झाली.

समाज रचनेतील तळाचा घटक हा सर्व संधीपासून वंचित होता, त्याला आरक्षणाच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात आणले. त्याचा दृश्यपरीणाम म्हणजे अस्पृश्यता नष्ट झाली. आपण आपले दिशादर्शक म्हणून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांकडे पाहिजे पाहिजे व त्यांचा समतेचा विचार आचरणात आणला पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

शिक्षक अमोल खिलारे यांनी विद्यार्थ्यांना सक्तीचे शिक्षण या संकल्पनेचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज होते असे सांगितले. व्याख्यानाला शाळेतील शिक्षक चंद्रकांत बरफ सुध्दा उपस्थित होते. तसेच अंनिसचे कार्यकर्ते अशोक निकम यांनी सुध्दा व्याख्यानात सहभाग नोंदवला.

# ‘ग्राईंडवेल नॉर्टन’च्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील मोरा येथील ग्राईडवेल नॉर्टन लिमिटेड, मोरा कंपनीतील कामगार व कर्मचारी यांची १२ मुले दहावी व बारावी मध्ये ७५ टक्केच्यावर गुण मिळवून पास झाली आहेत. ग्राईडवेल नॉर्टन लिमिटेड व्यवस्थापना च्या वतीने हेड ऑपरेशन कमलजीत सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली उतीर्ण झालेल्या मुलामुलींना भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले त्यांचे कौतुक करण्यात आले. त्याचप्रमाणे पालकांचे रोप देऊन स्वागत करण्यात आले.



यामध्ये दहावीतील पूर्वा चव्हाण, जानव्ही भोईर,जुई देरवणकर, श्रीयश शहासने, प्रणाली सपकाळ, वैष्णवी खेडकर, तर बारावीतील प्रसाद दाटेकर, अंकित राऊत, शंतनू आरेकर, राहुल भोईर, अद्वेत पाटील, सारा पाटील आदी उतीर्ण झाले आहेत.त्यांना भेट वस्तू देऊन व्यवस्थापना च्या अधिकाऱ्यांच्या हस्ते भेट देऊन कौतुक करून अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी ऑपरेशन हेड कमलजीत सिंह, हेड अप्लिकेशन इंजिनिअरींग प्रकाश पाटील, फायनान्स मॅनेजर सुहानंद अरे, मेंटेनन्स मॅनेजर सुरजित रे, व्यवस्थापनाचे वरिष्ठ मॅनेजर आय.बी. सिंह, ॲडमिनचे गणपत दाटेकर, ग्राईडवेल परिवार पालकवर्ग आदी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

पान १ वरून

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते वारकरी संप्रदायातील मान्यवरांचा सत्कार

मान्यवर सत्कारार्थी अरुणबुवा कारेकरांनी दि. बा. पाटीलसाहेबांच्या जीवनाचे चरित्र पुढील वर्षापर्यंत तयार व्हावे ही अपेक्षा व्यक्त केली. ती समाजाची गरज आहे. ते चरित्र हे समाजासाठी नक्कीच मार्गदर्शक, प्रेरणादायी असेल. मी घडवलेले महात्मा फुले यांचे शिल्प (पुतळा) या सभागृहाला भेट देणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

या वेळी ह. भ. प. एकनाथ आत्माराम पाटील (ज्येष्ठ सनदी लेखापाल व कीर्तनकार) ह. भ. प. विनायक महाराज कांबेकर (ज्येष्ठ कीर्तनकार), ह. भ.प. अरुणबुवा कारेकर (शिल्पकार व गायक), ह. भ. प. निवृत्तीबुवा चौधरी (संगीत विषारद, भजनी कलावंत) यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ‘दिबां’चे सुपुत्र अतुल पाटील, मंडळाचे उपाध्यक्ष जे. डी. तांडेल, सचिव बी. पी. म्हात्रे, सहसचिव विजय गायकर, सदस्य मेधा तांडेल, मनीषा तांडेल, मनस्वी पाटेकर यांच्यासह विद्याधर ठाकूर, पंढरीनाथ पाटील, खरे, विद्याधर पाटील यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास पत्रकार कटेकर, बाळकृष्ण म्हात्रे, व्ही. एन. ठाकूर, डी. बी. पाटील, काशिनाथ जाधव, तेजस पाटील, श्याम मोकल, श्री. ठाकूर, गणेश दाबणे, तुषार नाईक, अरुण म्हात्रे, राजू सावंत आदी मंडळीही हजर होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय गायकर यांनी केले.

# पेण तालुक्यातील शेतकऱ्यांचा कल शेततळ्याकडे

## शासकीय योजनांचा लाभ घ्यावा –कृषी अधिकारी अनिल रोकडे

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पेण तालुक्यातील अनेक शेतकरी भातशेती सोडून आता शेततळ्यांकडे वळले आहेत. तालुक्यातील विविध विभागातील शेतकऱ्यांना भातशेती करताना उत्पन्नापेक्षा जास्त खर्च आणि मेहनत लागत असल्याने शेतकऱ्यांची आपोआपच पावले तळे खोदण्याकडे वळली आहेत.



गेली अनेक वर्षे पिण्याच्या पाण्यापासून वंचित असलेला खारेपाट भाग जो शेतीसोबत मासेमारी करणारा आहे. एकीकडे कोकणात शेतकऱ्यांचा जोड व्यवसाय जरी वेगवेगळा असला तरी त्यावेळी सत्तर टक्के शेती व्यवसाय करणारे शेतकरी आणि तीस टक्के मासेमारी करणारे आहेत. मात्र आता हे गणित बिघडले असुन सध्यस्थितीला जवळपास साठ टक्के शेतकरी मासेमारी व्यवसायाकडे वळू लागले आहेत. मागील काही वर्षांचा विचार केला तर सतत घडत असणारे वातावरणातील बदल आणि वर्षभरात कधीही येणारा पाऊस या बदलत्या ऋतुचक्रामुळे शेतकऱ्याचे अंदाज चुकत आहेत, परिणामी मेहनत करून केलेली भातशेती फुकट जात आहे. शेतीची मशागत, पेरणी, लावणी, कापणी, झोडपणी करून शेतात पिकविलेले सोन्यासारखे भात घरामध्ये नेईपर्यंत हजारो रुपये खर्च होत असून यासाठी मेहनतही खूप करावी लागत आहे. मात्र शेतीसाठी जो खर्च होतो तो खर्च सुद्धा निघत नाही तर बऱ्याच वेळा कामासाठी कामगारही मिळत नाहीत. अनेकदा कामगारांसाठी भरमसाठ मजुरी भरावी लागते. यासर्व गोष्टींमुळे भातशेती करणारा शेतकरी या शेती व्यवसायाला कंटाळला असून त्याऐवजी आपल्याच शेतात शासनाच्या असणाऱ्या विविध प्रकारच्या योजनांच्या माध्यमातून शेततळी खोदून लाखो रुपये उत्पन्न घेणे पसंत करत आहेत. मागील तीन वर्षांचा विचार केला असता पेण तालुक्यात दरवर्षी दोनशे ते तीनशे हेक्टर शेती लागवडीचे प्रमाण कमी होत चालले आहे. यात तालुक्यातील अनेक शेतकरी शासनाच्या शेततळ्यांच्या योजनांचा फायदा घेऊन मासेमारी व्यवसाय करीत आहेत. त्यामुळे तालुक्यातील बरेच शेतकरी आता भातशेतीचा खर्च परवडणारा न झाल्याने शेततळ्यांकडे वळले आहेत.

दरम्यान, लवकरच शासनाची आणखी एक योजना शेतकऱ्यांसाठी जाहीर होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी शेततळ्यांच्या योजनांचा फायदा घ्यावा असे तालुका कृषी अधिकारी अनिल रोकडे यांनी सांगितले.

## खादी प्रसारक रघुनाथ कुलकर्णी यांचे निधन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

खादी ग्रामोद्योग क्षेत्रात ६० वर्षे कार्यरत असणारे रघुनाथ कुलकर्णी यांचे कोल्हापुरात अल्प आजाराने निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. कर्नाटकच्या सीमाभागात जन्म झालेल्या कुलकर्णी यांचे बालपण वर्धा येथे आश्रमात म. गांधी, विनोबा भावे यांच्या संस्कारी वातावरणात गेले. १९५५पासून ते खादी ग्रामोद्योग मंडळात सेवेला लागले. खादीच्या संशोधन विभागात त्यांनी खादी टिकाऊ, अधिक उत्पादक होण्यासाठी चरखा, माग, डिझाइन, रचना यात सुधारणा केल्या. खादी, रेशम, लोकर, समन्वय इत्यादी प्रशासकीय विभागांचे संचालक म्हणूनही काम केले. देशभरातल्या खादी उत्पादक संस्थाशी ते संपर्कात होते. महाराष्ट्र सेवा संघ, कलानिकेतन या संस्थामध्ये ते कार्यरत होते. खादीशी जुळले नाते हे त्यांचे आत्मचरित्रपर पुस्तक आहे. दरम्यान, त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, मुलगा, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.



## निवडक

### उरणमध्ये उद्या करिअर मार्गदर्शन

**उरण :** दहावी, बारावीचे आता निकाल लागलेले आहेत. अनेक जणांनी या परीक्षेत उत्तम गुणसुद्धा प्राप्त केलेले आहेत. आता विद्यार्थ्यांना पुढे काय करायचे असा प्रश्न पडला आहे. त्यामुळे दहावी, बारावीनंतर कोणकोणते व्यवसाय क्षेत्र अथवा नोकरीच्या संधी आहेत. कोणते कोर्स केल्यावर कोणत्या नोकऱ्या लागू शकतात या बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यासाठी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दहावी पास, बारावी पास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी सोमवारी (दि. २७) सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत उरण शहरातील तहसील कार्यालय समोरील कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

### पनवेलमध्ये 'इग्नु'तर्फे योग दिवस

**पनवेल :** इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (इग्नु) प्रादेशिक केंद्र मुंबई पनवेल येथे आठवा आंतरराष्ट्रीय



योगदिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात डॉ. ई. कृष्णा राव इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ प्रादेशिक केंद्र मुंबईचे क्षेत्रीय निदेशक, त्याचबरोबर राम पलत यादव पतंजली योग समितीचे योग तज्ञ व त्यांचे सहायक, रश्मी रंमगारीया, संगम योग क्लासेसचे व्यवस्थापक, मयूर तांबडे व संजय कदम उपस्थित होते.

### उलवेत हार्डवेअर दुकानात चोरी

**पनवेल :** एका बंद हार्डवेअरच्या दुकानात चोरी करून जवळपास ४३ हजार रुपये किमतीचे साहित्य चोरून नेल्याची घटना घडली आहे. उलवे येथील सेक्टर २३ मधील एका हार्डवेअरच्या दुकानाचे शटर उचकटून अज्ञाताने दुकानांतील ४३ हजार रुपये किमतीचे साहित्य चोरून नेले आहे. याप्रकरणी एनआरआय पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### वडघरमधून महिला बेपत्ता

**पनवेल :** वडघर गाव रमाबाई नगर येथे राहणारी एक विवाहित महिला कोठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. शितल राजेश ठोंबरे (वय २९) असे या महिलेचे नाव असून उंची पाच फूट एक इंच, केस काळे, रंग गोरा, बांधा मध्यम, चेहरा गोल, नाक बसके असून अंगात पोपटी कुर्ता व सफेद सलवार परिधान केला आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा पोहवा मारुती पवार यांच्याशी संपर्क साधावा.

# कळंबोलीत होणार सुरळीत पाणीपुरवठा

## जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोली वसाहतीमधील सेक्टर ४ मधील काही सोसायट्यांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत होता. त्यामुळे येथील रहिवाशांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. याबाबत येथील नगरसेवक बबन मुकादम यांनी सिडको व महापालिकेकडे पाठपुरावा केल्याने सहा इंच व्यासाची जलवाहिनी टाकून पाण्याचा पुरवठा करण्यासाठी काम सुरू केले आहे. सोसायटीमधील नागरिकांना मोठ्या दाबाने पाणीपुरवठा होणार असल्याने त्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

कळंबोली वसाहतीतील सेक्टर ४ मधील गुरू, गुरू प्रेम, अमरदीप व अन्य सोसायट्यांना कमी दाबाने पाणीपुरवठा गेल्या अनेक वर्षापासून होत होता. याबाबतची तक्रार या सोसायट्यांनी सिडको व महापालिकेकडे केली होती, तसेच येथील कर्तव्यदक्ष नगरसेवक बबन मुकादम यांच्याकडे ही या संदर्भात अनेक वेळा तक्रारी केल्या होत्या. त्याबाबतचा पाठपुरावा नगरसेवक बबन मुकादम यांनी महापालिका व सिडकोकडे केल्याने अखेर येथे १४५ मीटर लांबीची व सहा इंच व्यासाची नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम दोन दिवसांपासून सुरू केले आहे. या जलवाहिनीला अंदाजित खर्च चार लाख रुपये झाला आहे.

मोठ्या दाबाने पाणीपुरवठा होणार असल्याने गृहनिर्माण संस्थांमधील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे. मोठ्या दाबाने पाणी मिळणार असल्याने रहिवाशांनी नगरसेवक बबन मुकादम यांना धन्यवाद दिले आहेत.



## बनावट उत्पादनप्रकरणी कारखान्यावर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

नामांकित कंपनीचे बनावट उत्पादन करून विकणाऱ्या कारखान्यावर कारवाई करण्यात आली असून या प्रकरणी एका आरोपीवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. एका खासगी संस्थेच्या फिर्यादीवरून कळंबोली पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

रमेश वाडिया असे आरोपीचे नाव आहे. मुंबई येथे नेत्रिका कन्सलटिंग म्हणून एक खासगी संस्था असून ती बनावट उत्पादन करणाऱ्यांवर वा कॉपीराइट उल्लंघन करणाऱ्यांवर लक्ष ठेवते. वास्तू अंगण सोसायटी सेक्टर चार गाळा क्रमांक पाच कळंबोली येथे बनावट हार्पिक, लायाझोल, कोलीन आणि विम लिक्विड ही उत्पादन बनवून त्याच नावाने विकण्यात येतात अशी माहिती त्यांना मिळाली होती. या बाबत खात्री केल्यावर उत्पादन करणाऱ्या मूळ कंपनीने त्यांना कारवाईची परवानगी दिली. त्यानुसार त्या ठिकाणाहून नमुने घेण्यात आले व उत्पादने बनावट असल्याची खात्री करून घेतली. उत्पादने बनावट असल्याची खात्री पटल्यावर याबाबत कळंबोली पोलिसांना कळवण्यात आले.


पोलीस आणि संस्थेने मिळून कळंबोलीतील रिकेट बेनक्लीसेर प्रा. लि. कंपनी कारखान्यावर धाड टाकली. या ठिकाणी हार्पिक, लायाझोल, कोलीन, आणि विम लिक्विड या उत्पादनांचे उत्पादन करून व्यवस्थित पॅकिंग करून पुरवठा करण्यास तयार करण्यात आले होते, तो सर्व माल उघडून पाहिला असता सर्व बनावट निघाला. सर्व माल जप्त करण्यात आला. तसेच वाडिया याच्या विरोधात कॉपीराइट उल्लंघन अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## हरकती-सूचनांच्या सुनावणीनंतर अंतिम प्रभाग रचना होणार जाहीर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर तयार करण्यात आलेल्या प्रभाग रचना आराखड्यावर अवघ्या ३३ हरकती आल्या आहेत. महापालिकेच्या दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीच्या प्रभाग रचनेचा आराखडा १३ जून रोजी जाहीर करण्यात आला. हरकती-सूचनांच्या सुनावणीनंतर प्रभाग रचना अंतिम केल्या जाणार आहेत, अशी माहिती उपायुक्त विठ्ठल डाके यांनी दिली आहे.

पनवेल महापालिकेच्या नगरसेवकांची पाच वर्षांची मुदत ८ जुलै रोजी संपणार आहे. यानंतर महापालिकेचा कारभार प्रशासकाच्या हाती द्यावा लागणार आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने पनवेल



महापालिकेची निवडणूक घेण्याची तयारी सुरू केली आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशाने प्रभाग रचना तयार करून नागरिकांना हरकती आणि सूचना मांडण्याचे जाहीर केले होते. १३ जूनला जाहीर करण्यात आलेल्या प्रभाग रचनेत यंदा ८९ नगरसेवक असणार आहेत. ३० प्रभागांत विभागवार करण्यात आलेल्या रचनेत एका प्रभागात तीन नगरसेवक आणि ३० क्रमांकाच्या प्रभागात दोन नगरसेवक अशी रचना केली आहे. पालिकेच्या पहिल्या निवडणुकीवेळी जाहीर करण्यात आलेल्या प्रभाग रचनेपेक्षा यंदा प्रभाग रचना अधिक सुटसुटीत करण्यात आल्याचे नगरसेवकांचे म्हणणे आहे. त्यामुळेच यंदा अवघ्या ३३ हरकती, सूचना प्राप्त झाल्याचे निवडणूक विभागाकडून सांगण्यात आले. महापालिकेच्या पहिल्या निवडणुकीच्या प्रभाग रचनेत तब्बल १५० हरकती सूचना आल्या होत्या, असेही उपायुक्त विठ्ठल डाके यांनी सांगितले.



पनवेल : रायगड जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत यांना वाढदिवसानिमित्त केळवणे येथे भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या.

## पनवेल मनपाकडून खारघरमधील अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील सेक्टर ३४, ३५, ३६, ३७मध्ये शुक्रवारी (दि. २४) अनधिकृत ढाबे, गाड्या सर्व्हिसींग दुकाने, झोपड्या, भंगार दुकाने यांच्यावरती आयुक्त गणेश देशमुख यांनी दिलेल्या निर्देशानुसार कारवाई करण्यात आली. दुपारी ४ वाजेपर्यंत चार भंगार दुकाने, एक गाडी सर्व्हिसिंग दुकान, पाच झोपड्या, तीन ढाबे अशी एकुण १३ अनधिकृत व्यावसायिकांवर कारवाई करण्यात आली.

खारघरमध्ये अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने ढाबे, सर्व्हिसिंग दुकाने, झोपड्या, भंगार दुकाने या सर्वांवरती आयुक्तांनी कारवाई



करण्याचे निर्देश दिल्यानंतर खारघर प्रभाग समितीच्या अतिक्रमण विभागाने उपायुक्त कैलास गावडे यांच्या सूचनेनूसार प्रभाग अधिकारी जितेंद्र मडवी यांच्या नेतृत्वाखाली जेसीबीच्या साह्याने या अनधिकृत व्यावसायिकांवरती कारवाई करून, अतिक्रमणे जमीनदोस्त केली.

## ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी जयवंत गुर्जर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहर ज्येष्ठ नागरिक संघाची पंच वार्षिक निवडणूक संघाच्या मुख्यालयात झाली. मोठ्या उत्साहात सभासदांनी मतदानात सहभाग दाखविला. एकता पॅनलचे सर्व पदाधिकारी व सदस्य भरघोस मतांनी विजयी झाले.

माधुरी गोसावी उपाध्यक्ष, तर सचिवपदी सुनील नथुराम खेडेकर हे बिनविरोध निवडून आले. अध्यक्षपदी जयवंत गुर्जर, तर कोषाध्यक्षपदी शरद जोशी हे भरघोस मतांनी निवडून आले.

या निवडणुकीसाठी ज्येष्ठ नागरिकांचा प्रचंड उत्साह दिसून आला. सभासद म्हणून, भास्कर चव्हाण, सुरेश तुपे, दत्तात्रय ढोले, वंदना वि. दाते, नारायण देशपांडे, स्मिता फासे, प्रकाश मानिक, सुर्यकांत लांजेकर, प्रमोद वनगे ही सुविधा व काम करणारे सभासद निवडले गेले आहेत. एकता पॅनेलच्या सभासदांना निवडून आणण्यासाठी विद्यमान अध्यक्ष नंदकुमार जोशी, मोहन शिरोडकर, बलवंत गुर्जर याचे बहुमोल सहकार्य झाले.

याचप्रमाणे पंचवार्षिक निवडणूकीची प्रक्रिया, प्रत्यक्ष निवडणूक व मतमोजणीनंतरचे कार्य, निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सेवानिवृत्त तहसीलदार अशोक म्हात्रे यांनी उत्कृष्टरित्या पार पाडले आहे. त्यांना या कामी विनोद पांडे, उज्वला कुलकर्णी, शुभांगी कऱ्हाडकर व श्रीमती वैशंपायन यांचे सहकार्य लाभले.

# भुईमुगाच्या शेंगांवर एका गावाचे अर्थकारण

**पनवेल : नितीन देशमुख**

भुईमुगाच्या शेंगांवर आंध्रप्रदेश मधील नंद्याल जिल्ह्यातील एका गावाचे अर्थकारण अवलंबून आहे असे म्हटले तर कोणाला खरे वाटणार नाही, पण ही सत्य परिस्थिती आहे. आंध्रप्रदेशमधील शंभर कुटुंबे आपल्या मुंबईत उकडलेल्या भुईमुगाच्या शेंगा विकून गुजराण करीत आहेत. काहींची तिसरी पिढी येथे आहे. एकाच गावातील सगळे असल्याने त्या गावाचे अर्थकारणच त्यांच्यावर अवलंबून आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्वर्गीय लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे यासाठी त्यांच्या स्मृतिदिनी शुक्रवारी सिडकोविरोधात घेराव आंदोलन होते. आंदोलनात भाग घेणारे प्रकल्पग्रस्त व भूमिपुत्र जमा होत होते. सभास्थानाजवळ त्यावेळी उकडलेल्या भुईमुगाच्या शेंगा घेऊन काही महिला व पुरुष एका बाजूला घोळका करून उभे होते.

या वेळी त्यांनी सांगितले की, इथे आंदोलन असल्याने मोठ्या प्रमाणात लोक आल्यावर चांगला धंदा होतो. हा मागील वर्षीचा अनुभव असल्याने व आज एकादशी असल्याने चांगला धंदा होईल म्हणून सगळे इतर ठिकाणी न जाता इथे आले होते.



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

शिवा, भद्रा, शिवराम, यशोदा, दुर्गा, गंगा, व्यंकटेश व कुमार सगळे आंध्रप्रदेशमधील नंद्याल जिल्ह्यातील एकाच गावातील सगळे मिळून १०० जण आहेत. काही जणांचा जन्म ही इथलाच आहे. सध्या गोवे गावात अंबुजा सिमेंट कंपनीच्या बाजूला चाळीत हे सगळे भाड्याने जागा घेऊन रहात आहेत. येथे ते फक्त पती-पत्नीच राहतात. त्यांची मुले गावाला असतात. आता शाळेला सुटी असल्याने सध्या ती इकडे आली आहेत. इथे आल्यावर मुले ही शेंगा विकण्यासाठी मदत करीत असतात. प्रत्येकाला धंदा करण्यासाठी सीएमएसटी, दादर, कुर्ला, चेंबुर, वाशीपासून पनवेल पर्यंत एरिया वाटून दिलेला आहे. मोर्चा किंवा मोठी सभा असली तर मात्र सगळे एकाच ठिकाणी येतात. आमची चार मोठी माणसे आहेत ती सगळ्यावर लक्ष ठेऊन असल्याचे शिवाने सांगितले.

तो म्हणतो, पहाटे लवकर उठून एपीएमसी मार्केटमध्ये जाऊन शेंगा खरेदी करून आणतो. शेंगा आणल्यावर त्या भिजत ठेवायला लागतात त्यानंतर उकडतो. सकाळी आठ नंतर धंद्याला सुरुवात करतो ते रात्री ७-८ वाजेपर्यंत धंदा करतो. एरियामध्ये फिरलो तर दिवसभरात एक टोकरी माल विकला तर खर्च वजा जाऊन ५०० रुपये मिळतात. सभा किंवा मोर्चा असेल तर ८००-९०० रुपये मिळतात. पती-पत्नी दोघेही धंदा करीत असल्याने महिन्याला कमीत कमी २५ हजार रुपये कमवतात. त्यातील काही रक्कम गावाला पाठवतात, कारण यांची मुले गावाला आहेत. त्यांच्या हातातील टोकरी मोठी दिसत असली तरी ती अर्धीच असते खालच्या भागात कागद आणि त्यांचे खाण्याचे पदार्थ असतात.

पोलिसांचा त्रास होतो का विचारल्यावर त्यांनी सांगितले, पोलिसांचा त्रास होत नाही, पण रेल्वेत पकडलो गेलो तर मात्र दंड भरावा लागतो.

## कळंबोलीतून मायलेक बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली, सेक्टर १४ मधील सुमुख-को. ऑप. हाऊसिंग सोसायटीत राहणारी विवाहिता आपल्या पाच वर्षांच्या मुलासह बेपत्ता झाली आहे. या दोघांच्या मिसींगची तक्रार कळंबोली पोलिसांनी नोंद करून शोध सुरू केला आहे.

बेपत्ता झालेल्या महिलेचे नाव मिनाक्षी श्याम जैस्वार/आझाद (वय ३२) तर तिच्या मुलाचे नाव पियुश श्याम जैस्वार/आझाद (पाच वर्षे सहा महिने) असे आहे. मिनाक्षीचा वर्ण गोरा असून तिची उंची पाच फुट तीन इंच इतकी असून ती सडपातळ आहे. तिने हिरवा सलवार आणि काळी लेगीस घातली आहे. तर पियुशचा रंग गोरा असून त्याची उंची तीन फुट सहा इंच इतकी असून तोदेखील सडपातळ आहे. त्याने अंगात केशरी टी-शर्ट व पांढरी जीन्स घातलेली आहे.

या वर्णनाची महिला आणि मुलगा आढळून आल्यास त्याबाबतची माहिती तत्काळ कळंबोली पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सीकेटी विद्यालय परिसरात वृक्षारोपण

### स्वच्छंद सामाजिक विकास संस्थेचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या दहा वर्षांपासून सामाजिक उपक्रम राबविण्यात स्वच्छंद सामाजिक विकास संस्था ही नेहमीच अग्रेसर राहिली आहे. या संस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वृक्षारोपण कार्यक्रम शनिवारी (दि. २५) राबविला. यामध्ये नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयाच्या आवारात भाजप महिला मोर्चाच्या पनवेल तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

स्वच्छंद सामाजिक विकास संस्थेमार्फत राबवण्यात आलेल्या वृक्षारोपण उपक्रमात सीकेटी स्कूलमधील मुख्याध्यापीका, प्रिन्सिपल शिक्षिका शिक्षक व काही विद्यार्थ्यांच्या सहाय्याने मोठ्या उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी स्वछंद सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा नीता घाटुगडे, सुलभा मोरे, गुलाब थवई ताई, संध्या भुजबळ, स्वाती गरुड, शुभांगी दिक्षीत, मंगल शिंदे, आरती रमोड, शामल जगताप, सुचेता शेंडे, हेमा गोतमारे, मनीषा खोमणे, मानसी पाटील, मधुमती घरत, कविता चीपाडे, सविता काळे, सपना सोनावणे, करुणा भयसाने, कल्पना काळे, वंदना पाटील, सीमा डोंगरे, सविता मोहोड, मंदा उरणकर यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी आणि महिला उपस्थित होत्या.

या वेळी रत्नप्रभा घरत यांनी स्वच्छंद सामाजिक विकास संस्थेमार्फत राबवण्यात येत असलेल्या उपक्रमांचे कौतुक केले, तसेच येणाऱ्या काळात संस्थेला सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.




# रुपयाच्या घसरणीच्या संकटाचे तोटे आणि काही फायदेही!

***डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाचे मूल्य कमी होत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. मात्र भारताची आर्थिक स्थिती सध्या तुलनेने चांगली असल्याने भारतापुढील धोका घाबरण्यासारखा गंभीर असणार नाही. उलट, आर्थिक स्थैर्यामुळे भारत सहीसलामत बाहेर पडेल आणि वर्षभरात भारतीय अर्थव्यवस्था पुन्हा वेग घेईल.***

## अर्थ प्रहर

यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

गेल्या २४ जून रोजी एका डॉलरसाठी ७८.३४ रुपये मोजावे लागत होते. म्हणजे रुपयाची या वर्षात सुमारे पाच टक्के घसरण झाली आहे. रूपयाचे अवमूल्यन झाले, असे त्याला म्हटले जाते. पण या अवमूल्यनाचे अनेक पैलू आहेत. बदललेल्या जागतिक परिस्थितीत अवमूल्यनाकडे वेगळ्या दृष्टीने पाहिले पाहिजे. त्यातील पहिला भाग असा की, जागतिकीकरण आता या थराला गेले आहे की त्याचे परिणाम आपण आता टाळूच शकत नाही. दुसरा भाग असा की, ज्यांना 'इमर्जिंग इकोनॉमी' म्हणतात, अशा देशांची तुलना करता रुपयाची घसरण मर्यादित आहे. तिसरा भाग म्हणजे रुपयाची घसरण होते म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेला जसा तोटा होतो, तसा काही क्षेत्रात फायदाही होतो. आणि चौथा तेवढाच महत्त्वाचा भाग म्हणजे रुपयाची घसरण होत असताना पूर्वी जसा भारतीय अर्थव्यवस्थेला धोका निर्माण होत होता, तसा धोका आता नाही, कारण भारतीय अर्थव्यवस्था अस्थिर जागतिक वातावरणात तुलनेने खूपच स्थिर आहे.



रुपयाच्या दरातील घसरणीची कारणे आधी रुपयाच्या दरातील घसरणीची कारणे पाहू. कोरोना संकटातून बाहेर पडण्यासाठी अमेरिकेसह सर्व जगाने व्याज दर कमी केले होते, याचा अर्थ व्यवहारात तरलता ओतली होती. प्रमुख बँकांचे ताळेबंद २४ महिन्यात १९ ट्रीलीयन डॉलर्सवरून एकदम ३१ ट्रीलीयन डॉलर्स झाले होते. अर्थव्यवस्था पूर्वपदावर येवू लागताच, त्यातून महागाई वाढली. ती इतकी वाढली की, व्याजदर वाढवून अर्थव्यवस्थेतून पैसा काढून घेणे ही गरज बनली. त्यामुळे सर्व प्रमुख देशांनी (युएस फेडरल आणि युरोपियन सेन्ट्रल बँकसह) व्याजदर वाढविण्यास सुरुवात केली. अमेरिकेत व्याजदर वाढल्याने भारतातील अमेरिकी गुंतवणूकदार तेथेच गुंतवणूक करू लागले. म्हणूनच गेल्या सहा आठ महिन्यात त्यांनी भारतीय शेअर बाजारातील पैसा काढून घेण्याचा सपाटा लावला. ही गुंतवणूक जात असल्याने रुपयाची घसरण सुरु झाली. दुसरे कारण म्हणजे रशिया-युक्रेन युद्धामुळे तेलाचे भडकलेले दर. भारताचा तेलाचा वापर जगात तिसऱ्या क्रमांकाचा आहे. आणि त्यातील ८५ टक्के तेल आपल्याला आयात करावे लागते. तेल दरवाढीमुळे डॉलरची गरज दुपटीने वाढली. त्याचा परिणाम रुपयाच्या मूल्यावर न झाला तरच नवल. जागतिक व्यापारासाठी अजूनही डॉलरचा वापर सर्वाधिक होतो. अस्थिर जगात डॉलरचे महत्त्व वाढते. त्यामुळे गेल्या वर्षभरात डॉलर इंडेक्स ८९.५ वरून १०५.७९ इतका झाला आहे. हेही रुपया कमकुवत होण्याचे आणखी एक कारण आहे. तरीही रुपयाची घसरण आवाक्यात आहे. डॉलरच्या तुलनेत सर्वच देशांची चलने कमकुवत होत आहेत. भारताच्या रुपयाच्या घसरणीची इतर इमर्जिंग देशांशी तुलना करावयाची झाल्यास रुपयाची घसरण आवाक्यात आहे. या देशांमध्ये तुर्कस्तान, दक्षिण आफ्रिका, ब्राझील, चीन, अर्जेंटिना, मलेशिया, थायलंड, इंडोनेशिया या देशांचा समावेश होतो. या सर्व देशांची चलने मे महिन्यात १.५ ते ५.८ टक्क्यांनी घसरली आहेत. त्या तुलनेत रुपयाची घसरण ०.८ टक्के इतकी आहे. असे का झाले, याची काही कारणे आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारताकडे असलेला परकीय चलनाचा विक्रमी साठा. तो सध्या ६०० अब्ज डॉलरच्या घरात आहे. म्हणजे भारत पुढील दीड वर्षे आपल्या संपूर्ण आयातीसाठीचा साठा राखून आहे. रुपयाच्या दरात अनियंत्रित घसरण होऊ नये म्हणून रिझर्व बँक डॉलर विकू शकते. ही स्थिती या इतर देशांमध्ये नाही. तेलाचे वाढलेले दर, कर्ज फेडीसाठी लागणारे अतिरिक्त डॉलर, महागाईमुळे झालेली कोंडी यामुळे सर्वच देशांना चलनाच्या घसरणीचा फटका बसतो आहे. भारताला बसलेला फटका आणखी तीन कारणांनी मर्यादित झाला आहे.



पहिले म्हणजे भारताची या काळात वाढलेली विक्रमी निर्यात, दुसरे म्हणजे रशियाकडून कमी दरात आणि तेही रशियन चलनात मिळालेले तेल. (आता भारत आपल्या गरजेच्या १० टक्के तेल रशियाकडून आयात करतो, जी पूर्वी फक्त ०.२ टक्के होती.) आणि तिसरे म्हणजे कोरोनानंतर भारतीय अर्थव्यवस्थेने घेतलेला वेग.

**रुपयातील घसरणीचा फायदाही होतो!**

भारतातील माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्राचे ग्राहक जगातील जवळपास सर्वच देश आहेत आणि त्यातही अमेरिका तसेच युरोपियन देश आघाडीवर आहेत. या कंपन्या ज्या सेवा विकतात, त्याचा मोबदला त्यांना डॉलर तसेच युरोमध्ये मिळतो. शिवाय या क्षेत्रात असलेले पण अमेरिकादी देशात राहणारे भारतीय जो पैसा भारतात पाठवितात, तोही डॉलरमध्ये असतो. या दोन्ही कारणाने भारतातील परकीय चलन वाढत जाते. दुसरे म्हणजे भारतीय भांडवली बाजारात गुंतवणुकीसाठी जसे भारतीय नागरिक सक्रिय झाले आहेत, तसेच ते विदेशी विशेषतः अमेरिकी भांडवली बाजारातही सक्रिय झाले आहेत. अमेरिकेच्या बाजारात थेट किंवा म्युच्युअल फंडाच्या मार्गाने गुंतवणूक करणे आता सुकर झाल्यामुळे तेथील बाजाराचा फायदा भारतीय गुंतवणूकदारांना मिळू लागला आहे. डॉलर असाच वाढत राहिला तर या मार्गाने त्याचा फायदा देश आणि देशातील गुंतवणूकदारांना मिळत राहील. शिवाय आयात निर्यात व्यापाराचा विचार करता रुपयाची घसरण ही अनेकदा निर्यातवाढीसाठी उपयोगी ठरते. भारताने गेल्या काही वर्षात वाढविलेली निर्यात लक्षात घेता त्याचाही काही फायदा आपल्याला मिळत राहील. अर्थात, याकडे फक्त संकटातील संधी म्हणूनच पाहता येईल.


### • घाबरण्याचे काही कारण नाही •

*रुपया गेल्या सहा महिन्यात पाच टक्क्यांनी घसरला आणि आणखीही घसरू शकतो. पण म्हणून घाबरण्याचे कारण नाही. कारण १९९१ किंवा २०१३ सारखा भारत आता कमकुवत राहिलेला नाही. २०१३मध्ये भारत आर्थिकदृष्ट्या पाच नाजूक देशांच्या रांगेत उभा होता आणि त्यामुळे रुपयांचे विक्रमी अवमूल्यन झाले होते. त्यावेळी रुपया सहा महिन्यात २९ टक्के घसरला होता. (प्रतिडॉलर ५३ वरून ६८ रुपये) परकीय चलनाचा साठा २७५ अब्ज डॉलर एवढा खाली आला होता. शिवाय तेव्हा चालू खात्यावरील तूट ६.८ टक्के होती, जी आज २.५ टक्के म्हणजे बरीच आवाक्यात आहे. विक्रमी निर्यात, विक्रमी महसूल, भारताचे अनेक देशांशी सुधारलेले संबंध आणि राजकीय स्थैर्य, यामुळे आर्थिक आघाडीवर भारत आज स्थिर आहे. व्याजदर वाढविण्याची युएस फेडरलने ठरविलेली सायकल पूर्ण झाली आणि त्यातून रुपया आणखी काही काळ घसरत राहिला तर परकीय गुंतवणूकदारांना भारत पुन्हा आकर्षक वाटू शकतो. त्यामुळे ते पुन्हा भारतात गुंतवणुकीला सुरुवात करतील. गुंतवणुकीची ही सायकल पूर्ण होईपर्यंत भारताला सध्याचे आर्थिक स्थैर्य टिकवायचे आहे. याचा अर्थ रशिया युक्रेन युद्धाचा अडथळा सोडला तर भारताची अर्थव्यवस्था पुन्हा वेग पकडू शकेल.*

---

# बाजारातील ऑप्शनचा खेळ आणि जोखीम!

***प्रत्येकजण बाजारात पैसेच कमावण्यासाठीच येत असतो, परंतु प्रत्येकाची पद्धत वेगवेगळी. जेव्हा ही पद्धत जुगार खेळण्याच्या भावनेने अवलंबली जाते तेव्हा त्यासाठी केली जाणारी ही गुंतवणूक ठरत नाही तर त्यास सट्टा म्हटले जाते. ज्यासाठी असंख्य ऑप्शन ट्रेडर्स हे बाजारात जोखीम घेत असतात. बहुतांशी ट्रेडर्स हे दृश्य जोखीम सांभाळून मर्यादित नुकसान आणि अमर्यादित नफा कमाविण्याच्या दृष्टीने आपल्या पोझिशन्स घेत असतात.***



प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

'आठवडी बाजार' हा भारताच्या सांस्कृतिक आणि पारंपरिक वातावरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. हे अनौपचारिक बाजार आठवड्यातून एका ठराविक दिवशी व विशिष्ट ठिकाणी भरविले जातात. सर्वसाधारणपणे गावातील वर्दळीच्या ठिकाणी असे आठवडी बाजार भरतात. हेतू एकच की, उत्पादक व ग्राहक यांचा थेट संबंध जोडणे. धान्य, भाजीपाला, फळे अशा दैनंदिन जीवनावश्यक गोष्टी पुरवण्यासाठी आठवड्यातून एकदा स्वतः शेतकरीदेखील हजेरी लावतात तर इतर वस्तू उत्पादक, कला प्रदर्शक, घरगुती पदार्थ उत्पादक, जुनाट वस्तू विकणारे या दिवशी आपल्या गोष्टी विकण्यास तत्पर असतात. त्यामुळे असा वैविध्यपूर्ण बाजार थोरामोठ्यांसाठी कुतूहलाची गोष्ट असते. मॉल संस्कृती व ऑनलाईन खरेदीमुळे आज मोठ्या शहरांमध्ये जरी ही पद्धत संपूर्णपणे नामशेष होण्याच्या मार्गावर असली तरी काही छोट्या शहरात ही पद्धत अजूनही जोपासली जाते.

याव्यतिरिक्त शेअर बाजारात देखील असा आठवडी बाजार असतो. ज्यास आपण वीकली एक्स्पायरी म्हणून ओळखतो. राष्ट्रीय बाजारामधील निफ्टी, बँकनिफ्टी व आता फिननिफ्टी या निर्देशांकांवरील ऑप्शन्स कॉंट्रॅक्ट हे एक आठवड्याच्या मुदतीचेदेखील उपलब्ध आहेत. दर आठवड्याच्या गुरुवारी हे ऑप्शन्स एक्स्पायर होतात, म्हणजेच अशा ऑप्शन्समध्ये व्यवहार करण्याची मुदत ही प्रत्येक शुक्रवार ते पुढील गुरुवार अशी ५ दिवसांची असते.

मागच्याच गुरुवारी म्हणजे २३ जून रोजी संपलेल्या अशा आठवडी बाजारात खूप जास्त चंचलता अनुभवली गेली. बँक निफ्टी या निवडक बँकांच्या समुदायाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या निर्देशांकातील ३३००० ची स्ट्राईक प्राईस असलेल्या ऑप्शन कॉंट्रॅक्टने केवळ सहा तासांत तुफान करामत दाखविली.

जास्त खोलात न शिरता थोडक्यात म्हणजे, आठवड्याच्या मुदतीत व्यवहार करण्यासाठी असलेला एक प्रकार (ऑप्शन) ज्याचे मूळ असलेला बँकनिफ्टी निर्देशांक हा ३३००० पातळीवर जितक्या अंशाने बंद होईल तितकी या ३३००० स्ट्राईक प्राईस कॉल ऑप्शन कॉंट्रॅक्टचा भाव असेल म्हणजेच जर बँक निफ्टी निर्देशांक गुरुवारी जर ३३०५० ला बंद झाल्यास, या ऑप्शनचा बंद भाव ५० रुपये असेल. तर या ऑप्शनचा दिवसाच्या सुरुवातीचा भाव २७४ वरून ६५, नंतर ६५ वरून ४६० तर नंतर ४६० वरून थेट १३, मग १३ पासून ३०५, पुन्हा ३०५ हून ४६, परत ४६ वरून ३०९ आणि सरतेशेवटी १३५ वर बंद झाला. अशी वेडीवाकडी वध-घट अनेक वर्षांनी अनुभवायला मिळाली. अर्थातच यामधून अनेक ऑप्शन ट्रेडर्सना मोठे नुकसान सोसावे लागले असू शकते.

खरंच, संभाव्यता व त्यानुसार मिळणारा नफा हा खरेच अनाकलनीय विषय आहे. समजा एखाद्यास विचारले की पुढील आठवड्यात बाजार वर जाईल की खाली आणि जर त्याचं उत्तर 'वरती' असे असेल तर जितके पैसे तो बाजार वर जाणार या अपेक्षने लावेल त्याच्या काही प्रमाणात त्यास परतावा मिळेल जो फार काही आकर्षक नसेल. परंतु समजा त्याच्या अपेक्षेच्या विरुद्ध जाऊन बाजार पडण्यावर लावलेले पैसे त्यास अधिक जास्त कमाई करून देऊ शकतील.

यासाठी आपण क्रिकेट जगतातील सर्वांत गाजलेल्या मॅचचे उदाहरण घेऊया. १२ मार्च २००६ साली जोहान्सबर्गच्या मैदानावर प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने ५० षटकांत ४३४ धावा काढल्या होत्या. साहजिकच त्या वेळेस ऑस्ट्रेलियाच जिंकणार हे छातीठोकपणे कोणीही सांगू शकत होते, समजा त्या वेळी जर ऑस्ट्रेलिया जिंकणार म्हणून कोणी पैज लावायला आले असते तर? त्याला कोणीही भाव दिला नसता कारण उघडउघड दिसतेय की ही मॅच ऑस्ट्रेलियाच जिंकेल.

परंतु ऑस्ट्रेलियाची इनिंग झाल्या झाल्या समजा कोणी सांगितले असते की दक्षिण आफ्रिका ही मॅच जिंकेल, तर त्याला वेड्यात काढून कोणीही त्याच्याशी पैज लावायला तयार झाले असते. कारण ऑस्ट्रेलियावरील पैज हरण्याचा धोका हा अशक्य होता. परंतु सर्व सहज वर्तवलेल्या संभाव्यता खोट्या ठरवत दक्षिण आफ्रिकेने ती मॅच १ चेंडू व १ गडी राखून जिंकली. क्रिकेट जाणकारांसाठी ही बाब नक्कीच आश्चर्यकारक होती. वास्तव




अशक्य पण सत्य होते.

म्हणजेच वर म्हटल्याप्रमाणे probability doesn't matter but Pay-Offs do ! म्हणजेच, संभाव्यता काही मायने ठेवीत नाही परंतु मिळणारा नफा हाच महत्त्वाचा असतो.

इथे लॉटरीचेदेखील उदाहरण नमुन्या दाखल घेता येईल. दैनंदिन लॉटरीमध्ये एका नंबरवर पैसे लावले जातात आणि तुम्ही ज्या नंबरवर पैसे लावलेले असतात तो नंबर लॉटरी नंबर ठरल्यास तुमच्या लावलेल्या रकमेच्या काहीपट रक्कम तुम्हाला बक्षीस म्हणून मिळते ज्याची शक्यता हजारांत एकदा असते. याबद्दल साधा युक्तिवाद म्हणजे प्रत्येक आकड्यावर एकूण किती रक्कम लावली गेलेली आहे हे लॉटरी मालकास माहिती असते आणि सर्वांत कमी रक्कम ज्या आकड्यावर लावली गेलेली असते तोच नंबर लॉटरी नंबर म्हणून घोषित केला जातो, त्यामुळं बाकीच्या सर्व आकड्यांवर लागलेले पैसे वाया जाऊनहा त्या मालकाचा फायदा असतो. अगदी असंच उदाहरण शेअर बाजारातीलऑप्शन मार्केट मध्ये दिसून येते.

कोणत्यातरी एकाच भावात निर्देशांक बंद होणार असल्यानं, त्यामुळं त्या विशिष्ट भावांव्यतिरिक्त इतर सर्व स्ट्राईक प्राईसच्या ऑप्शन्सचा भाव शून्य होतो. यालाच ऑप्शन मार्केटमध्ये ऑप्शन पेन किंवा मॅक्स पेन संबोधले जाते.

प्रत्येकजण बाजारात पैसेच कमावण्यासाठीच येत असतो, परंतु प्रत्येकाची पद्धत वेगवेगळी असू शकते. जेव्हा ही पद्धत जुगार खेळण्याच्या भावनेने अवलंबली जाते तेव्हा त्यासाठी केली जाणारी ही गुंतवणूक ठरत नाही तर त्यास सट्टा म्हटले जाते. ज्यासाठी असंख्य ऑप्शन ट्रेडर्स हे बाजारात जोखीम घेत असतात.

बहुतांशी ट्रेडर्स हे दृश्य जोखीम सांभाळून मर्यादित नुकसान आणि अमर्यादित नफा कमावण्याच्या दृष्टीने आपल्या पोझिशन्स घेतात. नक्कीच यात गैर वाटण्यासारखे काहीच नाही. परंतु खरी गुंतवणूक म्हणजे काही जुगार नव्हे. अशा ठिकाणी कधीच 'हे' नाहीतर 'ते' अशी परिस्थिती नसते, क्वचीतच अशी परिस्थिती (संधी) मिळू शकते, जिथं रंकाचा राजा होत असतो.

परंतु, प्राथमिकतः कोणत्याही ट्रेडर अथवा गुंतवणूकदारांने अशीच रक्कम गुंतवावी अथवा ट्रेडिंगसाठी लावावी. ज्यामुळे त्याच्या दैनंदिन जीवनावर कोणताही परिणाम होणार नाही आणि त्याचे अथवा तिचे आर्थिक भवितव्यदेखील धोक्यात येऊ शकणार नाही. म्हणजेच, Never bet the amount that you can't afford to lose, दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर जितकी रक्कम आपण सहज गमावू शकतो तितकीच रक्कम ट्रेडिंगसाठी गुंतवणूक म्हणून वापरावी.

वाचकांनी पुन्हा लक्षात घ्यावे की हे व्यवहार लॉटरीच्या व्यवहारासारखे आहेत. तुम्ही कॉल किंवा पुट ऑप्शन खरेदी करताय म्हणजे समजा लॉटरीचे तिकीट खरेदी करताहेत. त्या बाबतीत निर्देशांक अथवा शेअरभाव कितीही वरती / खाली झाले किंवा अपेक्षेप्रमाणे त्यामध्ये अजिबात हालचाल झाली नाही तरीही होणारे नुकसान हे ऑप्शनच्या खरेदी किंमतीइतकेच मर्यादित असते आणि म्हणूनच बव्हंशी ट्रेडर्स हे असे ऑप्शन्स खरेदी करताना आढळतात.

अशा व्यवहारांमध्ये साधारणपणे गुंतवणुकीच्या तिप्पट अथवा चौपट परतावा मिळाल्यास नफा पदरात पडून घेणे इष्ट ठरू शकते. जितकी स्ट्राईक प्राईस लांबची तितकी जोखीम कमी व तेथपर्यंत निर्देशांकाचा भाव जाण्याची शक्यतादेखील कमी. व्यक्ती तितक्या प्रकृती आणि पद्धती. यामुळे प्रत्येकाने विचार करणे गरजेचे आहे. त्यामुळे आपल्याला यातील काय झेपते, हे ज्याचे त्याने ठरवायचे आहे, हे मात्र निश्चित आहे.

---

## अर्थसाक्षर स्पर्धा : २४

### निकाल पुढीलप्रमाणे

**प्रश्न क्र. १. भारतात सध्या एलआयसीसह एकूण किती जीवन विमा कंपन्या आहेत?**

***अ.*** २४

**प्रश्न क्र. २. म्युच्युअल फंडाचे व्यवस्थापन भारतात सध्या किती कंपन्या करतात?**

***आ.*** ४४

**प्रश्न क्र. ३. भारतीय शेअर बाजारात सर्वाधिक बाजारमूल्य असलेली बँक कोणती?**

***अ.*** एचडीएफसी बँक

**अर्थसाक्षर स्पर्धा २४च्या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा २४साठी एकही विजेता नाही.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २५

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावीत (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणती कंपनी आर्टीफिशीयल इंटलिजियन्स क्षेत्रात काम करणारी नाही?**

***अ.*** टाटा एलक्सी ***आ.*** हॅपीइस्ट माइंड
***इ.*** झेन्सर टेक्नोलॉजीस ***ई.*** बीएएसएफ इंडिया

**२. लाईफ इन्शुरन्स ऑफ कार्पोरेशन (एलआयसी) चे मुख्यालय या शहरात आहे.**

***अ.*** दिल्ली ***आ.*** कलकत्ता
***इ.*** मुंबई ***ई.*** चेन्नई

**३. अदानी उद्योग समूहातील कोणत्या कंपनीची अलीकडे शेअर बाजारात नोंद झाली?**

***अ.*** अदानी इंटरप्रायझेस ***आ.*** अदानी विल्मर
***इ.*** अदानी ग्रीन एनर्जी ***ई.*** अदानी पॉवर

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्री हिराबेन यांनी शनिवार, दि. १८ जून २०२२ रोजी वयाच्या शंभराव्या वर्षात पदार्पण केले. यानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांची भेट घेतली आणि आपल्या आईविषयी कृतज्ञता भाव व्यक्त करणारा सविस्तर ब्लॉगही लिहिला आहे. पंतप्रधान मोदींची जडणघडण, विचारसरणी आणि एकूणच संस्कारांमागील त्यांची मातृप्रेरणा शब्दबद्ध करणाऱ्या या ब्लॉगचा हा संपादित अंश...**

# आई



## मातृवंदन

| नरेंद्र मोदी |

आई, हा केवळ एक शब्द नव्हे, आई तर आयुष्यातली अशी भावना आहे, ज्यामध्ये सामावल्या आहेत वात्सल्य, धैर्य, विश्वास आणि अशा अपार भावना जगातला कोणताही भाग असो, कोणताही देश असो, प्रत्येक मुलाच्या मनात आपल्या आईसाठी सर्वांत अनमोल स्नेह भावना असते. आई, आपल्याला केवळ जन्मच देते असे नव्हे, तर आपले मन, आपला आत्मविश्वास, आपले व्यक्तिमत्त्व ती घडविते. आपल्या मुलांसाठी ती आयुष्यभर झिजते, स्वतःला समर्पित करते. आज माझा आनंद, माझे भाग्य आपणा सर्वांसमवेत मी सामायिक करू इच्छितो. माझ्या आईने १८ जूनला वयाच्या शंभराव्या वर्षात प्रवेश केला आहे. म्हणजेच आईचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले आहे. वडील आज असते, तर गेल्या आठवड्यात तेही १०० वर्षांचे झाले असते. म्हणजे २०२२ हे असे वर्ष आहे, ज्यामध्ये माझ्या आईचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले आहे आणि याच वर्षात माझ्या वडिलांचे जन्मशताब्दी वर्ष पूर्ण झाले आहे. गेल्याच आठवड्यात माझ्या पुतण्याने गांधीनगर इथून आईचे काही व्हिडिओ पाठविले आहेत. सोसायटीमधले काही युवक घरी आले आहेत. वडिलांचे छायाचित्र खुर्चीवर ठेवले आहे, भजन–कीर्तन सुरू आहे, आई तल्लीन होऊन भजन म्हणत आहे. टाळ वाजवत आहे. आई आजही तशीच आहे. शरीर भले थकले असले तरी मनाची ऊर्जा तशीच कायम आहे.

खरे तर आमच्याकडे वाढदिवस साजरा करण्याची पद्धत नाही, मात्र कुटुंबातली नव्या पिढीतली मुले आहेत त्यांनी वडिलांच्या जन्मशताब्दी वर्षांत यावेळी १०० झाडे लावली. आज माझ्या जीवनात जे काही चांगले आहे, माझ्या व्यक्तिमत्त्वात जे काही चांगले आहे, ती आई–वडिलांची देणगी आहे. आज मी इथे दिल्लीत बसलो आहे, कितीतरी जुन्या आठवणी मनात फेर धरत आहेत. माझी आई जितकी सामान्य आहे तितकीच असामान्यही आहे. जशी सर्वांची आई असते अगदी तशीच! आज मी आईविषयी लिहित आहे, ते वाचून तुम्हाला असे वाटू शकेल, माझी आईही असेच तर करते. हे वाचताना तुमच्या डोळ्यांसमोर तुमची आई येईल. आईची तपस्या, तिच्या अपत्याला आदर्श माणूस घडवते. आईचे वात्सल्य, तिच्या मुलामध्ये मानवी भाव–भावना जागृत करते. आई म्हणजे केवळ एक व्यक्ती नव्हे, एक व्यक्तिमत्व नव्हे, तर आई म्हणजे एक स्वरूप आहे. आपल्याकडे म्हटले जाते जसा भक्त तसा ईश्वर. त्याप्रमाणेच आपल्या मनात जसा भाव असेल त्याप्रमाणे आपण आईचे स्वरूप अनुभवू शकतो.

माझ्या आईचा जन्म मेहसाणा जिल्ह्यातल्या विसनगर इथे झाला. वडनगरपासून हे फार दूर नाही. माझ्या आईला तिच्या आईचे म्हणजे माझ्या आजीचे प्रेम लाभू शकले नाही. १०० वर्षांपूर्वी आलेल्या जागतिक महामारीचा तेव्हा अनेक वर्षे प्रभाव राहिला होता. त्या महामारीने माझ्या आजीला, माझ्या आईपासून हिरावून नेले. आई तेव्हा काही दिवसांचीच असेल. तिला आपल्या आईचा, माझ्या आजीचा चेहरा, तिची कुशी काहीच आठवत नाही. आपण विचार करा, माझ्या आईचे बालपण आईविना गेले, तिला आपल्या आईकडे हट्ट करता आला नाही. आईने शाळेचा उंबरठाही पाहिला नाही, अक्षरज्ञान प्राप्त करण्याचे भाग्य तिला लाभले नाही. तिने पाहिली ती केवळ गरिबी आणि घरात चोहीकडे अभाव. आजच्या काळाशी तुलना केली, तर आपण कल्पना करू शकतो की, आईचे बालपण किती खडतर होते. कदाचित तिचे जीवन असेच घडवण्याची ईश्वराची इच्छा असेल. मात्र, आपली आई गमावल्याचे, तिचा चेहराही हिरावल्याचे दुःख तिला आजही सलते. लहानपणी केलेल्या संघर्षामुळे माझी आई अकाली प्रौढ झाली. आपल्या कुटुंबात ती सर्वांत मोठी होती आणि लग्न झाल्यावर ती सर्वांत मोठी सून झाली. लहानपणी ती आपल्या घरातल्या सर्वांची जशी चिंता करत असे, त्यांची काळजी घेत असे, घराचे सर्व कामकाज करत असे तशाच जबाबदाऱ्या तिला सासरी आल्यावर तिच्या अंगावर आल्या. या सर्व जबाबदाऱ्यांमध्ये, या समस्यांमध्ये आई नेहमीच शांतपणे प्रत्येक परिस्थितीत कुटुंबाचा सांभाळ करत राहिली.

वडनगरच्या ज्या घरात आम्ही राहत होतो, ते घर अतिशय छोटे होते. त्या घराला खिडकी नव्हती, न्हाणीघर नव्हते, शौचालयही नव्हते. मातीच्या भिंती आणि खापराचे छत असलेला एक–दीड खोल्यांचा तो ढाचा म्हणजे आमचे घर होते. त्यामध्ये आई–वडील, आम्ही सर्व बहीण–भावंडे राहत होतो. त्या छोट्याश्या घरात आईला स्वयंपाक करणे सोयीचे व्हावे म्हणून वडिलांनी घरात बांबूच्या पट्ट्या आणि लाकडाच्या फळ्या टाकून मचाणासारखे एक तयार केले होते. हे मचाण आमच्या घरातले स्वयंपाकघर होते. आई त्यावर बसून स्वयंपाक करत असे आणि आम्ही त्यावरच बसून जेवत असू. आईही वेळेबाबत दक्ष होती. तिलाही पहाटे ४ वाजता उठण्याची सवय होती. पहाटे–पहाटेच बरीचशी कामे ती उरकत असे. गहू, बाजरी दळणे असो नाहीतर तांदूळ–डाळ निवडणे असो, सर्व कामे ती स्वतः करत असे. काम करताना आपल्या आवडीची भजने किंवा भूपाळ्या ती गुणगुणत असे. नरसी मेहता जी यांचे एक प्रसिद्ध भजन आहे, जलकमल छांडी जाने बाला, स्वामी अमारो जागशे हे तिच्या आवडीचे आहे. एक अंगाई गीतही आहे, शिवाजी नु हालरडु...' आई हे पण बऱ्याच वेळी गुणगुणत असे.

आम्ही भावा–बहिणींनी आपला अभ्यास सोडून तिला मदत करावी अशी तिची अपेक्षाही नव्हती. आपल्या कामात मदत करायला ती कधी सांगत नसे. आई सतत कामात गुंतलेली बघून आम्हा भावा–बहिणींना स्वतःलाच वाटत असे की, तिला कामात मदत करावी. मला तलावात पोहण्याची, तलावात आंघोळ करण्याची फार आवड होती म्हणून घरातले कपडे तलावात धुण्यासाठी मी घेऊन जात असे. कपडेही धुवून होत आणि मला पाण्यात खेळताही येत असे. घर चालवण्यासाठी थोडे आणखी पैसे मिळावेत म्हणून आई दुसऱ्यांच्या घरी भांडीही घासत असे. वेळ काढून चरखाही चालवत असे. कारण, यातूनही थोडी कमाई होत असे. कापसाच्या बोंडातून कापूस काढणे, कापसापासून धागा तयार करण्याचे काम ही सर्व कामे ती स्वतः करत असे. कापसाच्या बोंडाच्या टरफलाचे काटे आम्हाला टोचतील, अशी तिला भीती वाटत असे.

आईला घर सजवण्याची, घर सुंदर ठेवण्याचीदेखील खूप आवड होती. घर स्वच्छ दिसावे याकरिता ती दिवसभर काहीनाकाही करत असे. ती घरातील जमिनी शेणाने सारवत असे. आई एका गोष्टीकडे विशेष लक्ष देत असे, ते म्हणजे अंथरूण अतिशय स्वच्छ आणि टापटीप असावे, त्यावर एक ही धुळीचा कण असलेला तिला खपत नसे. थोड्याशा सुरकुत्या दिसल्या तरी ती पूर्ण चादर झटकून पुन्हा अंथरत असे. आम्हीसुद्धा आईच्या या सवयीचे पालन करत असू. आज इतक्या वर्षांनंतरही आई ज्या घरात राहते, तिथे अंथरुण जरादेखील विस्कटलेले नाही ना याकडे ती बारकाईने लक्ष देते. आईच्या स्वच्छतेविषयीच्या प्रेमाचे इतके किस्से आहेत की, लिहिण्यात खूप वेळ जाईल. आईमध्ये आणखी एक खास वैशिष्ट्य आहे. जी व्यक्ती स्वच्छतेचे, साफसफाईचे काम करते तिलादेखील आई खूप मान देते. मला आठवतंय, वडनगरमध्ये आमच्या घराजवळील नाल्याची साफसफाई करायला जे येत असत, त्यांना आई चहा घेतल्याशिवाय जाऊ देत नसे. पशूपक्ष्यांवर दया करणे हा तिच्या संस्कारांचा भाग आहे. उन्हाळ्याच्या दिवसात ती पक्ष्यांकरिता मातीच्या भांड्यामध्ये दाणे आणि पाणी जरूर ठेवत असे. आमच्या घराच्या आजूबाजूला राहणारे रस्त्यावरचे कुत्रे उपाशी राहू नयेत, याचीसुद्धा आई काळजी घ्यायची.

जेवणाच्या बाबतीत आईचा नेहमी एक आग्रह असे की, अन्नाचा एकही कण वाया जाता कामा नये. आमच्या गावी जेव्हा कोणाच्या लग्न समारंभात पंगतीत जेवण असे, तेव्हा जेवताना अन्नाची नासाडी करू नका, असे आई सर्वांना लक्षात आणून देत असे. घरातदेखील आईने हाच नियम केला होता, जितकी भूक असेल, तितकेच अन्न ताटात घ्यावे याकडे तिचा कटाक्ष असे. आई आजसुद्धा जितके खायचे असेल तितकेच पदार्थ ताटात वाढून घेते. आई नेहमीच इतरांना आनंदी बघून स्वतः आनंदी राहते, घरात जागा भले कमी असेल, पण तिचे मन मोठे आहे. आमच्या घराच्या जवळच एक गाव होते, जिथे माझ्या वडिलांचे अतिशय जवळचे स्नेही राहात असत. त्यांचा मुलगा होता, अब्बास. वडिलांच्या मित्राच्या अकाली निधनानंतर त्यांनी अब्बासला आमच्या घरीच आणले होते. घरातील इतर मुलांप्रमाणेच आई, अब्बासची देखील खूप काळजी घेत असे. ईदच्या दिवशी आई अब्बासकरिता त्याच्या आवडीचे पदार्थ बनवत असे. सण उत्सवांच्या काळात जवळपासची काही मुले आमच्या घरी जेवायला येत असत, त्यांना आईच्या हातचे जेवण खूप आवडत असे.

आमच्या घराच्या परिसरात जेव्हा एखादे साधू–महात्मे येत असत, तेव्हा आई त्यांना घरी बोलावून अवश्य खाऊ घालायची. जेव्हा ते निघायचे तेव्हा आई स्वतःकरिता नव्हे, तर आम्हा मुलांकरिता आशीर्वाद मागत असे. ती त्यांना म्हणायची की, माझ्या मुलांना असा आशीर्वाद द्या की, ते दुसऱ्याच्या सुखात स्वतःचे सुख मानतील आणि दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होतील. आपल्या मुलांमध्ये भक्ती आणि सेवाभाव जागृत होऊ दे, असा आशीर्वाद ती मागत असे. माझ्या आईचा माझ्यावर गाढ विश्वास आहे. तिला तिच्या संस्कारांवर पूर्ण विश्वास आहे. मला अनेक दशकांपूर्वीची एक घटना आठवते. त्याकाळात मी संघटनेत असताना लोकसेवेच्या कामात गुंतलो होतो. कुटुंबीयांशी अजिबात संपर्क नव्हता. याच काळात, एकदा माझा मोठा भाऊ माझ्या आईला बद्रीनाथ, केदारनाथच्या दर्शनासाठी घेऊन गेला होता. आईचे बद्रीनाथाचे दर्शन झाले तेव्हा केदारनाथमधील लोकांनाही माझी आई येत असल्याची बातमी मिळाली. त्याचवेळी अचानक हवामान खूप खराब झाले. हे पाहून काही लोक केदारघाटी उतरून खाली जाऊ लागले. ते आपल्यासोबत काही रजयादेखील घेऊन गेले. ते रस्त्याने दिसणाऱ्या वयोवृद्ध महिलांना विचारत होते की, तुम्ही नरेंद्र मोदींच्या आई आहात का? असेच विचारत ते आईला भेटले. त्यांनी आईला रजई दिली, चहा दिला, मग तर ते यात्रेच्या कालावधीत आईसोबतच राहिले. केदारनाथला पोहोचल्यावर त्यांनी आईच्या निवासाची चांगली सोय केली. या घटनेचा आईच्या मनावर मोठा परिणाम झाला. तीर्थयात्रेवरून परतल्यावर माझी आई मला भेटली तेव्हा ती म्हणाली, तू काही चांगलं काम करत आहेस, लोक तुला ओळखतात. आता या घटनेला इतकी वर्षे होऊन गेल्यावर जेव्हा लोक आईच्या जवळ जाऊन तिला विचारतात की, तुमचा मुलगा पंतप्रधान आहे, याचा तुम्हाला नक्कीच अभिमान वाटत असेल, यावर आईचे उत्तर अतिशय सखोल आहे. आई त्यांना सांगते की, जितका तुम्हाला अभिमान वाटतो, तितकाच मलाही वाटतो. तसेही माझे काहीच नाही, मी तर निमित्तमात्र आहे. तो तर देवाचा आहे. तुम्ही हेही पाहिलं असेल की, माझी आई कधीही कोणत्याही सरकारी किंवा सार्वजनिक कार्यक्रमात माझ्यासोबत जात नाही. आत्तापर्यंत दोनदाच ती माझ्यासोबत सार्वजनिक कार्यक्रमात आली आहे. एकदा, एकता यात्रेनंतर श्रीनगरच्या लाल चौकात तिरंगा फडकावून मी परतलो होतो, तेव्हा अहमदाबादमधील नागरी सन्मान कार्यक्रमात माझी आई व्यासपीठावर आली आणि तिने मला कुमकुम तिलक लावला होता. तो क्षण आईसाठी भावनिक होता. कारण, एकता दौऱ्यादरम्यान फगवाडा येथे एक हल्ला झाला होता आणि त्यात काही लोक मारले गेले होते. त्यावेळी आईला माझी फार काळजी वाटत होती. तेव्हा मला दोन जणांचा फोन आला होता. एक फोन अक्षरधाम मंदिराचे अध्यक्ष प्रमुख स्वामीजी यांचा होता आणि दुसरा फोन माझ्या आईचा होता. माझी परिस्थिती जाणून घेऊन आईला हायसे वाटले.







जेव्हा पहिल्यांदा मुख्यमंत्री म्हणून माझा शपथविधी झाला, तेव्हा सार्वजनिक पातळीवर दुसऱ्यांदा माझी आई माझ्यासोबत आली होती. २० वर्षांपूर्वी झालेला हा शपथविधी म्हणजे माझी आई माझ्यासोबत सार्वजनिकरित्या उपस्थित राहिली आहे, असा शेवटचा समारंभ होता. त्यानंतर ती कधीही एखाद्या कार्यक्रमात माझ्यासोबत आली नाही.

आई तिच्या नागरी कर्तव्यांबाबत नेहमीच खूप सजग असते. निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यापासून ग्रामपंचायत ते लोकसभा अशा सर्व निवडणुकांमध्ये तिने मतदानाचे कर्तव्य निभावले आहे. काही काळापूर्वी, गांधीनगर महानगरपालिका निवडणुकीच्या वेळीदेखील आई मतदान करायला गेली होती. ती मला अनेक वेळा म्हणते की, हे बघ बाळा, जनतेचा आशीर्वाद तुझ्यासोबत आहे, तुझे कधीही काही वाईट होणार नाही. ती सांगते की, स्वतःचे शरीर नेहमी सुदृढ राख, स्वतःला निरोगी ठेव. कारण, शरीर निरोगी असेल तरच तू उत्तम प्रकारे काम देखील करू शकशील. एकेकाळी आई अत्यंत नेमाने चातुर्मासाचे व्रत करत असे. नवरात्रीच्या वेळी माझे नेमनियम काय असतात ते आईला ठाऊक आहेत. पूर्वी ती काही म्हणत नसे, आता मात्र सारखी मला सांगत असते की, नवरात्रीच्या काळात जे कडक व्रत–उपवास करत असतोस, ते आता जरा सोप्या पद्धतीने करू. मी माझ्या संपूर्ण आयुष्यात आजपर्यंत आईला कोणाची तक्रार करताना ऐकलेले नाही. ती कधी कुणाची तक्रार करत नाही आणि कोणाकडून काहीच अपेक्षादेखील ठेवत नाही.



आजघडीला माझ्या आईच्या नावावर कोणतीही संपत्ती नाही. मी तिच्या शरीरावर कधी सोने नाही पाहिले. तिला सोन्या चांदीच्या दागिन्यांचा मोह नाही. ती पूर्वीदेखील साधेपणाने राहायची आणि आजही तशीच तिच्या छोट्याश्या खोलीत अत्यंत साधेपणाने जीवन जगते आहे.

देवावर आईची गाढ श्रद्धा आहे. मात्र, अंधविश्वासापासून ती शेकडो कोस दूरच असते. आमच्या घराला तिने नेहमीच अंधविश्वासाच्या पगड्यापासून दूर ठेवले आहे. ती पूर्वीपासून कबीरपंथाची उपासक आहे आणि त्याच परंपरेला अनुसरून तिची पूजाअर्चा सुरू असते आणि हो, जपमाळ घेऊन जप करण्याची सवय लागली आहे. तिला दिवसभर तिचे भजन गाणे आणि जपमाळ घेऊन नामस्मरण करणे कधीकधी इतके पराकोटीला जाते की ती झोपणेसुद्धा विसरते. घरच्या लोकांना तिची माळ लपवून ठेवावी लागते, तेव्हा कुठे ती झोपायला तयार होते आणि मग तिला झोप लागते. एवढे वय होऊनदेखील आईची स्मरणशक्ती आजही फार उत्तम आहे. अनेक दशकांपूर्वीच्या गोष्टी तिला चांगल्या प्रकारे आठवतात. आजही कोणी नातेवाईक तिला भेटायला जातो तेव्हा ती लगेच त्यांच्या आजी–आजोबांची नावे घेऊन सांगते की, 'अरे, तू त्यांचा नातेवाईक आहेस.' जगात काय चालले आहे यावर आजही आईचे लक्ष असते. एवढ्यातच मी माझ्या आईला विचारले की, तू हल्ली टीव्ही बघतेस की नाही? त्यावर आई म्हणाली की, टीव्हीवर जेव्हा बघावे तेव्हा सतत सगळे आपसात भांडत असतात. अर्थात काहीजण असेही आहेत जे शांततेने त्यांचे म्हणणे सांगतात, अशा लोकांचे कार्यक्रम मी बघते. आई इतका विचार करते आहे हे बघून मी आश्चर्यचकित झालो. तिच्या प्रखर स्मरणशक्तीच्या बाबतीत आणखी एक गोष्ट मला आठवते आहे. ही २०१७ सालची गोष्ट आहे. मी तेव्हा उत्तर प्रदेशातील निवडणुकांच्या कार्याच्या अखेरच्या काळात काशी येथे राहत होतो. तेथून मी जेव्हा अहमदाबादला गेलो, तेव्हा आईसाठी काशीहून प्रसाद घेऊन गेलो. आईला भेटलो तेव्हा तिने विचारले की, काशिविश्वनाथ महादेवाचे दर्शन तरी घेतलेस का? आई संपूर्ण नावच घेते काशिविश्वनाथ महादेव. मग थोड्या वेळाने तिने विचारले की, काशिविश्वनाथ महादेवाच्या मंदिरापर्यंत जायचा रस्ता अजूनही तसाच आहे का? असे वाटते की, कोणाच्यातरी घरातच हे मंदिर आहे. मी हैराण होऊन तिला विचारले की, तू केव्हा तिथे गेली होतीस? तेव्हा तिने सांगितले की, खूप वर्षांपूर्वी तिचे जाणे झाले होते. अनेक वर्षांपूर्वी केलेल्या तीर्थयात्रेतील गोष्टी तिला तपशीलवार आठवत होत्या. आईकडे जितकी जास्त संवेदनशीलता आहे, सेवावृत्ती आहे तितकीच तिची नजरदेखील खूप पारखी आहे. तिला लहान मुलांच्या छोट्या मोठ्या आजारांवरच्या देशी उपचारपद्धती माहीत आहेत. वडनगरच्या आमच्या घरात तर नेहमीच सकाळपासून लोकांची रांग लागलेली असते. अगदी सहा–आठ महिन्यांच्या लहान बाळांची तपासणी करायला लोक आईकडे घेऊन येतात.

माझ्या दिनचर्येमुळे, माझ्या विविध प्रयोगांमुळे, कधीकधी माझ्या आईला माझ्यासाठी वेगळी व्यवस्था करावी लागत असे. पण, तिच्या कपाळावर कधी आठी पडली नाही, आईला कधीच याचे ओझे वाटले नाही. जसे मी महिनोमहिने मीठाचा त्याग करून अळणी जेवत असे. कधी कधी असे व्हायचे की, आठवडे न आठवडे मी जेवण सोडून फक्त दूध प्यायचो. कधी कधी ठरवायचो, आता सहा महिने गोड पूर्णपणे बंद. हिवाळ्यात मी उघड्यावर झोपायचो, मडक्यातील थंड पाण्याने आंघोळ करायचो. मी स्वतःची परीक्षा घेत होतो. आई मला समजून घेत असे. ती कधीच तिचे म्हणणे लादत नसे. ती हेच म्हणायची, ठीक आहे बाबा, जशी तुझी इच्छा.

आईला कल्पना होती मी वेगळ्या वाटेने जात आहे. मला आठवते, एकदा आमच्या घराजवळच्या गिरी महादेव मंदिरात एक महात्मा आले होते. ते तपश्चर्या करायचे. मी मनापासून त्यांची सेवा करायचो. त्याच दरम्यान माझ्या मावशीचे लग्न होते. घरातील प्रत्येकाला तिथे जायचे होते. मामाच्या घरी जायचे होते. आपल्या बहिणीचे लग्न म्हणून आईही खूप उत्साहात होती. सगळे आपापल्या तयारीत व्यग्र होते, पण मी आईकडे गेलो आणि सांगितले की, मला मावशीच्या लग्नाला यायचे नाही. आईने कारण विचारल्यावर मी तिला महात्माजींची गोष्ट सांगितली. आईला, मी तिच्या बहिणीच्या लग्नाला येत नसल्याबद्दल वाईट वाटले, पण तिने माझ्या इच्छेचा आदर केला. ती म्हणाली की, ठीक आहे, जशी तुझी इच्छा. पण, तिला काळजी वाटत होती की, मी घरी एकटा कसा राहणार? मला काही त्रास होऊ नये म्हणून तिने चार–पाच दिवस कोरडे अन्न तयार करून घरात ठेवले होते.

जेव्हा मी घर सोडण्याचा निर्णय घेतला तेव्हाही माझ्या आईला ते खूप आधीपासूनच ठाऊक झाले होते. मी बोलता बोलता आई–बाबांना सांगत असे की, बाहेर जाऊन जग काय आहे ते मला पाहावेसे वाटते. मी त्यांना म्हणायचो, रामकृष्ण मिशनच्या मठात मला जायचे आहे. मी त्यांच्याशी स्वामी विवेकानंदांबद्दलही खूप बोलायचो. आई–वडील हे सर्व ऐकत असत. हे असे अनेक दिवस सुरू होते. शेवटी एक दिवस मी माझ्या पालकांना घर सोडण्याची माझी इच्छा सांगितली आणि त्यांचे आशीर्वाद मागितले. माझे बोलणे ऐकून माझे वडील खूप दुःखी झाले. ते थोडे खिन्नपणे म्हणाले तू जाणो आणि तुझे काम जाणो. पण, असे आशीर्वाद न घेता घराबाहेर पडणार नाही, असे मी सांगितले. आईला माझ्याबद्दल सगळे माहीत होते. तिने पुन्हा माझ्या मनाचा आदर केला. ती म्हणाली, जे तुझे मन सांगत आहे तेच कर. तिने वडिलांच्या समाधानासाठी सुचवले की, त्यांची इच्छा असल्यास माझी जन्मपत्रिका कोणाला तरी दाखवून घ्यावी. आमच्या एका नातेवाईकाला ज्योतिषविषयक ज्ञान होते. माझी जन्मपत्रिका घेऊन बाबा त्यांना भेटले. कुंडली पाहिल्यानंतर त्यांनी सांगितले की, त्याचा मार्गच काही वेगळा आहे, जिथे देवाने ठरवले आहे, तिथेच तो जाईल. त्या नंतर काही तासांतच मी घर सोडले. तोपर्यंत माझ्या वडिलांच्या मनाचीही तयारी झाली. वडिलांनी मला आशीर्वाद दिला. घरातून निघण्यापूर्वी आईने मला दही आणि गूळही खायला दिला. आता पुढे माझे जीवन कसे असणार, हे तिला समजले होते. आईने मनाचा कितीही निर्धार केला तरी जेव्हा तिचे मूल घरापासून दूर जाते तेव्हा तिला दुःख होतेच. आईच्या डोळ्यात अश्रू तरळले होते, पण त्यात माझ्यासाठी खूप आशीर्वाद होते. घर सोडल्यानंतर, मी जिथे जिथे राहिलो, ज्या परिस्थितीत राहिलो, आईच्या आशीर्वादाची अनुभूती कायम माझ्यासोबत राहिली. माझ्या आईने मला नेहमीच आपल्या तत्त्वांवर ठाम राहण्यासाठी, गरिबांसाठी काम करत राहण्यासाठी प्रेरणा दिली आहे.

मला आठवतंय, जेव्हा माझे मुख्यमंत्री होणे निश्चित झाले. तेव्हा मी गुजरातमध्ये नव्हतो. विमानतळावरून मी थेट आईला भेटायला गेलो. आनंदी झालेल्या आईचा पहिला प्रश्न होता, तू आता इथेच राहणार का? आईला माझे उत्तर माहीत होते. मग ती मला म्हणाली मला तुझे सरकारमधील काम समजत नाही. पण तू कधीही लाच घेऊ नयेस हीच माझी इच्छा आहे. इथे दिल्लीत आल्यानंतर आईला भेटणेही कमी झाले आहे. जेव्हा गांधीनगरला जातो तेव्हा कधीकधी आईच्या घरी जाणे होते. आईशी भेट होते, फक्त काही क्षणांसाठी. पण, आजपर्यंत मला माझ्या आईच्या मनात कसलीही नाराजी किंवा दुःख जाणवलेले नाही. आईचे प्रेम पूर्वीसारखेच आहे. आईचे आशीर्वाद पूर्वीसारखेच आहेत. आई नेहमी विचारते दिल्लीत बरे वाटते का? मन रमते ना? ती मला वारंवार आश्वस्त करते की, माझी काळजी करू नकोस, तुझ्यावरची जबाबदारी मोठी आहे. आईशी जेव्हा कधी फोनवर बोलणे होते तेव्हा ती सांगते, हे बघ, कधीही चुकीचे काम करू नको, वाईट काम करू नकोस, गरिबांसाठी काम कर. आज मी माझ्या आई आणि वडिलांच्या जीवनाकडे पाहतो तेव्हा जाणवणारी त्यांची सर्वात मोठी वैशिष्ट्ये म्हणजे प्रामाणिकपणा आणि स्वाभिमान गरिबीशी संघर्ष करत असताना परिस्थिती कशीही असो, माझ्या पालकांनी कधीही प्रामाणिकपणाचा मार्ग सोडला नाही किंवा त्यांच्या स्वाभिमानाशी तडजोड केली नाही. प्रत्येक अडचणीतून बाहेर पडण्याचा एकच मार्ग त्यांच्याकडे होता. मेहनत, रात्रंदिवस मेहनत. जोपर्यंत वडील हयात होते, तोपर्यंत आपण कोणावरही भार होऊ नये, हे सूत्र त्यांनी पाळले. आजही माझी आई कोणावरही ओझे होऊ नये, यासाठी प्रयत्न करते. जेवढे शक्य असेल तेवढे स्वतःचे काम स्वतः करावे या प्रयत्नात जगते. आजही जेव्हा मी आईला भेटतो तेव्हा ती नेहमी म्हणते की, मरेपर्यंत माझी कोणाला सेवा करावी लागू नये, चालत्या फिरत्या स्थितीमध्येच जग सोडून जाण्याची माझी इच्छा आहे. माझ्या आईच्या जीवनयात्रेत मला देशाच्या अखिल मातृशक्तीचे तप, त्याग आणि योगदानाचे दर्शन घडते. जेव्हा माझ्या आईच्या आणि तिच्यासारख्या कोट्यवधी महिलांच्या सामर्थ्याचे दर्शन घडते तेव्हा मला जाणवते, भारतातील भगिनी– कन्यांना अशक्य असे काहीच नाही. अभावाच्या प्रत्येक कथेहून मोठी एका आईची गौरवगाथा असते. संघर्षाच्या प्रत्येक क्षणापेक्षा खूप मोठी एका आईची इच्छाशक्ती असते.

आई, वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा. तुमचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत आहे. तुमच्यासाठी जाहीरपणे इतके लिहिण्याचे, बोलण्याचे धाडस कधी केले नव्हते. आपले आरोग्य उत्तम राहो, आपला आशीर्वाद आम्हा सर्वांवर राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. आपल्या चरणी वंदन! ■■■

# वाचनाने माणूस समृद्ध होतो


**तुम्ही वाचता तेव्हा तुम्ही काय करता? म्हणजे आपण वाचू लागलो आणि वाचत राहिलो तर आपल्या अस्तित्त्वामध्ये कोणते बदल होतात? एक तर, तुमची आतली कवाडं उघडलेली असतात. ही कवाडं बाहेरून आत उघडणारी-स्वागतशील अशी असतात. बाहेरून काहीतरी त्या दरवाजाने आत, मेंदूपर्यंत, मनापर्यंत-कदाचित आत्म्यापर्यंत येऊ शकतं. आता ही आत येणारी 'वस्तू' किती मौल्यवान आहे, किती अस्सल आहे यावर वाचनाचा आनंद अवलंबून असतो. तुमचे संस्कार जागृत होऊन नव्याने अविष्कृत होत असतील तर हे वाचन चिरस्मरणीय असेच होत असते. वाचन म्हणजे जणू स्वतःचा शोधच असतो आणि आत्मशोध ही अपरिहार्य अशी अन् बहुधा अंतिम अशी मनाची अवस्था आहे. सुदैवी माणसाला त्यामुळे, आज ना उद्या वाचनाकडे वळावे लागते. आयुष्याच्या विविध टप्प्यांवर वाचन माणसाला समृद्ध करते. दिलासा देते-कदाचित जगणे सुसह्य करते. नामवंत साहित्यिकांकडून या उत्तम साहित्यकृतींची या सदरातून आपल्याला ओळख करून देत आहोत...**




रोहिदास पोटे,
कवी/गझलकार/समीक्षक

वाचाल तर वाचाल
साहित्यिकांची आवडती पुस्तके





## मातीचा देह -डॉ. सुभाष कटकदौंड



मातीचा देह हा डॉ. सुभाष कटकदौंड यांचा कथासंग्रह वाचनात आला. आयुष्यात घडून गेलेल्या सत्य घटनांवर आधारित एकोणीस कथा आहेत. यातील एकएक कथा म्हणजे जीवन अनुभवण्याचा अर्क आहे. डॉ. सुभाष कटकदौंड हे स्त्रीरोग तज्ञ आहेत. त्यापेशातील अनेक घटनांचे कथाबीज घेऊन त्यांनी कथावृक्ष तयार केले आहेत. कथा वाचताना त्यातून व्यक्ती, प्रसंग, घटना, व्यक्तीचित्रणे या विविध कंगोऱ्यातून मन तृप्त आणि समृध्द होते. एक-एक कथा म्हणजे एक अनुभव आहे. या एकोणीस कथांची शिर्षके पाहिली तरी त्यातून त्यांचे कथाविश्व लक्षात येते. 'डॉक्टर माझे गर्भाशय मला परत हवंय'!, 'मातीचा देह', 'घुसमट', 'मुखत्यार शेख', 'मायेचा स्पर्श', 'भूत', 'श्रीखंड', 'आठवणीतले आधारकार्ड', 'फेब्रुवारी १९७२', 'शिळी भाकरी' या सर्व कथा वाचताना ते प्रसंग, ते कथानक ती पात्रे नजरेसमोर उभी राहतात. डॉ. कटकदौंड यांची लेखणी समर्थ असल्याचे दिसून येते. संवेदनशील, सकारात्मकता, संस्कारशीलतेचा प्रत्यय येतो. पुन्हा पुन्हा वाचत राहाव्यात अशा या १९ कथा आहेत. त्या वाचतच राहाव्यात. मातीचा देह सचेतन होऊन जातो. महाजन पब्लिसिंग हाऊस पुणे यांनी हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

## शाईचे गणगोत -विष्णू सोळंके



'शाईचे गणगोत' हे विष्णू सोळंके यांचे व्यक्तीचित्रणात्मक पुस्तक होय. विष्णू सोळंके हे अमरावतीचे लेखक, कवी, गझलकार, लेखक आहेत. एस.टी. खात्यातून ते सेवानिवृत्त झालेले आहेत. पण ते कधीच कष्टी नाहीत. शाईने शब्दांना जीवंत करणारे लेखक, कवी, गझलकार, नाटककार व समाजसेवक म्हणजे 'शाईचे गणगोत' हे समर्पक शीर्षक घेऊन ३६ महनीय व्यक्तींची चित्रणे त्यांनी रेखाटली आहेत. यात प्रामुख्याने वसंत आबाजी डहाके, डॉ. अशोक पळवेकर, कवी मधुकर केचे, प्रा. अरुण सांगाळे, प्रज्ञा गणोरकर, प्रा. गिरीश खारकर, कवी ग्रेस, विठ्ठल वाघ, सुलभा हेर्लेकर, अजीम नवाज राही, प्रा. बी. टी. देशमुख, सुरेश देशमुख, सुरेश भट अशा नामवंत, किर्तीवंत, यशवंत व्यक्तींची यशोगाथा त्यांनी उलघडून दाखविली आहे. हे ३६ लेख वाचल्यानंतर सकारात्मक गुणाची भर पडल्याशिवाय राहत नाही. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वाची नस पकडून विशेष उल्लेखनीय लिहिले आहे. त्यांची लेखणी देखणी आहे. हे 'शाईचे गणगोत 'त्यांनी शाही थाटात सांगितले आहे. ३६ व्यक्तींची चरित्रे वाचल्याचे समाधान मिळते. प्रेरणादायी, यशदायी, आणि आनंददायी व्यक्तींच्या आयुष्यातील महत्त्वाचे पैलू विष्णूजींनी विशद केले आहेत. अमरावतीच्या नभप्रकाशनची ही पुस्तक निर्मिती आहे. सगळ्यांनी वाचावे असे प्रेरक व भेदक पुस्तक.

## एक कैफियत -डॉ. बाळासाहेब लबडे




'एक कैफियत' हे डॉ. बाळासाहेब लबडे यांचे पुस्तक. हा गझलसंग्रह म्हणजे एक अनोखी भेट आहे. डॉ. लबडे हे कादंबरीकार, कवी व गझलकार आहेत. 'एक कैफियत' हा गझलेचा नजराणा आहे. गझल का वाचावी तर एकाच वेळी शेकडो कविता वाचण्याचा आनंद मिळतो. शेर हे गझलचे एकक. एक शेर म्हणजे एक स्वतंत्र कविताच होय. एका शेरात एक विशिष्ट खयाल भरलेला असतो. हा गझल संग्रह म्हणजे एकूण ८७ गझलचा संग्रह एका गझलमध्ये कमाल सात/आठ शेर व किमान पाच शेर आहेत. सरासरी सहा शेर जरी पकडले तरी ५२५पेक्षा जास्त शेर म्हणजे तेवढ्या या कविताच या संग्रहात आहेत. शेरातील स्वतंत्र खयाल म्हणजे जगण्याचे सवाल आहेत. सामाजिक बांधिलकीच्या सर्जनात्मक विविध प्रतिमा प्रतिमांचा वापर करुन गझलांचा हा गझल त्यांनी केला आहे. गझलातील विविध शेर म्हणजे तत्त्वज्ञानांनी ठासून भरलेले उखळीचे बार आहेत गझलेच्या शेरातून वाचक रसिकांना वाचताना झटका बसतो तो कधी आनंदाचा कधी आत्मप्रत्ययाचा तर कधी अखिल मानव जातीच्या कल्याणाचा तो झटका असतो. गझलेतील तो खटका असतो तो असा आत्मप्रत्ययाचा झटका निश्चित देतो-

**माणसाने असे जागले पाहिजे**
**माणसासारखे वागले पाहिजे**
**मी तुला पाहता तू मस्त भावले**
**एकमेकांवरी जीव ओवाळले**

हे पुस्तक महाजन पब्लिसिंग हाऊस पुणे यांनी प्रकाशित केले.

## उगमाकडे जाताना -प्रा. सुजाता राऊत



उगमाकडे जाताना हा काव्यसंग्रह प्रा. सुजाता राऊत यांचा आहे. त्या केवळ कवयित्रीच नाहीत. आधुनिक कविता म्हणजे २००० नंतरच्या कवितेवर संशोधन करीत आहेत. संशोधन व समीक्षक म्हणून त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यांचा उगमाकडे जाताना हा काव्य संग्रह म्हणजे एक सुंदर निर्मिती आहे. एकूण ६१ कवितांचा हा संग्रह वाचता वाचता वाचकाला स्वत:च्या उगम स्थानाकडे घेऊन जातो. 'स्व'चा शोध घेणे म्हणजे एक जीवघणे असते. स्वत:चे अस्तित्व आणि 'स्व'चा उगम शोधताना मनाची होणारी स्पंदने आणि आंदोलने ही अनेक वलये निर्माण करतात. त्यांच्या कविताची काही शिर्षके पाहिली की कवियित्रीच्या संवेदनशील वृत्तीचा व सकारात्मक वृत्तीचा प्रत्यय येतो. 'अश्रूंचे वय', 'काहीही वाटले तरी', 'बाईला आवडते', 'चतकोर', 'संवाद', 'नातं तुटताना', 'आजी सुरकुतल्या देहाची', 'तिचं बंड', 'रिकामा वर्ग', 'उगमाकडे जाताना' अशी शिर्षके कवयित्रीच्या काव्यात्मक उत्कटतेचा प्रत्यय देतात. मानवी मनाचा गुंता, मानवी नातेसंबध, स्त्री जाणिवांचा खोल डोह, या जाणिवा सुंदर प्रतिमांच्याव्दारा चित्रित केल्या आहेत. मुक्त घराची काय ताकद असते. त्याचे प्रत्यंतर या कविता वाचल्यावर येते. यातील काही ओळी-

**बाईला आवडतं**
**नदी सारखं वाहणे,**
**थेट उगमापासून थेंबाथेंबाने**
**जीवनरस झिरपत ठेवणं.**
**बाईपण कसं असतं**
**त्वचेलाच चिकटलेलं**
**तिच्यात नकळत**
**तिच्या शिरांमध्ये भिजलेलं**

मुळातून वाचाव्यात अशा या ६१ कविता आहेत. कवयित्रीची ही काव्य यात्रा म्हणजे एक आत्मशोध आहे. वाचकालाही अंतर्मुख व्हायला लावते.

# ज्येष्ठ पत्रकार अशोक जालनावाला यांना आदरांजली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ठाणे व रायगड जिल्ह्यातील पत्रकारिता क्षेत्रात दादा म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ पत्रकार स्वर्गीय अशोक जालनावाला यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त गुरुवारी (दि. २३) वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात त्यांना आदरांजली वाहण्यासाठी स्वर सुमनांजलीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांना आदरांजली वाहताना त्यांच्या पत्रकारितेतील कार्यकर्तृत्वाला उजाळा दिला.




कै. अशोक जालनावाला यांनी पत्रकारिता क्षेत्रात कार्य करताना समाजातील विविध प्रश्नांना नुसती वाचा फोडली नाही, तर त्या प्रकरणांना शेवटपर्यंत तडीस नेऊन त्यांना न्याय मिळवून दिला. लोकांना अन्याया विरूध्द लढायला शिकवले, त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी सचोटीने प्रयत्न केले. त्यामुळेच लोकांची त्यांच्यावरील विश्वासार्हता वाढत गेल्याने नवी मुंबईच्या जडण घडणीत दिवंगत अशोक जालनावाला यांचे योगदान मोठे असल्याचे सुतोवाच आमदार गणेश नाईक यांनी या वेळी केले.

कै. अशोक जालनावाला यांच्या स्वभावातील करारीपणा उत्कृष्ट देहबोली, बोलण्यातील जरब या गोष्टी इतरांपेक्षा उजव्या असल्याने प्रथमदर्शणीच समोरच्यावर त्यांची छाप पडल्याशिवाय राहत नसे, अशा भावना या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी व्यक्त केल्या.

बातमीतील अनन्यपणा हे त्यांचे पत्रकारितेतील सर्वांत मोठे बलस्थान, वैशिष्ट्य होते. अतिशय निर्भिड आणि निडर राहिल्यामुळे पत्रकरितेतील सर्व आव्हानांना कै. अशोक जालनावाला समर्थपणे पेलू शकले. पत्रकारितेत बातमीसाठी त्यांच्याकडे असलेली उत्तम तिक्ष्ण नजर आणि समोरच्याने न बोललेलेही ऐकू येणारे कान त्यांच्यापाशी होते, असे पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर या वेळी म्हणाले.

या वेळी ज्येष्ठ पत्रकार हेमंत जुवेकर, विकास महाडिक, नारायण जाधव, जयेश सामंत व राज्याच्या माहिती विभागाचे माजी संचालक देवेंद्र भुजबळ यांनीदेखील कै. अशोक जालनावाला यांच्या सोबत पत्रकारिता क्षेत्रात काम करताना आलेल्या अनुभवांच्या आठवणींना उजाळा दिला. प्रास्ताविक निलेश जालनावाला यांनी तर आभार मनोज जालनावाला यांनी मानले. सूत्रसंचालन महापालिका जनसंपर्क अधिकारी महेंद्र कोंडे यांनी केले.

दरम्यान, उपस्थित मान्यवरांनी आदरांजली वाहिल्यानंतर पं. संजीव अभ्यंकर यांनी सादर केलेल्या भक्तीगीतांच्या स्वर सुमनांजलीने उपस्थित श्रोतेगण मंत्रमुग्ध झाले.

# वाशीतील गांधर्व महाविद्यालयात संगीत कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील गांधर्व महाविद्यालयात सोमवारी (दि. २७) संगीत कार्यक्रम होणार आहे. महाविद्यालयातील गांधर्व निकेतन, प्लॉट क्रमांक ५, ९ ए वाशी येथे सायंकाळी ६ वाजता कार्यक्रम सुरू होईल. या वेळी महेश कुलकर्णी यांचे गायन होणार आहे.

श्रीराज ताम्हणकर (तबला), राज भद्रा, कौस्तुभ भाग्यवंत, सोहम जगताप (सह तबला), सतार वादन संजय देशपांडे करतील. विश्वास जाधव, विनायक नाईक (तबला), सिद्धेश मेस्त्री, सारंग कुलकर्णी (संवादिनी) साथसंगत करणार आहेत. या वेळी संगीत रसिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संदीप वाळके यांनी केले आहे.

# सिडको अधिकार क्षेत्रात उद्यापासून २५ टक्के पाणीकपात

**पाणी जपून वापरण्याचे आवाहन**

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

धरण क्षेत्रात अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने, सिडको महामंडळातर्फे सिडको अधिकार क्षेत्रातील नोड आणि गावांतील नागरिकांना पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे तसेच पाटबंधारे विभागाने सिडको महामंडळास सूचित केल्यानुसार उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोरपणे नियोजन करण्यासाठी २७ जूनपासून सिडकोतर्फे २५ टक्के पाणीकपात करण्यात येणार आहे.

सिडकोतर्फे सिडको अधिकारक्षेत्रातील विविध नोड, गावे आणि हेटवणे पाणीपुरवठा योजना जलवाहिनी मार्गावरील गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो. सिडकोचे हेटवणे धरण, नवी मुंबई महानगरपालिकेचे मोरबे धरण, एमआयडीसीचे बारवी धरण आणि मजीप्राचे पाताळगंगा धरण या जलस्त्रोतांद्वारे सिडकोकडून पाणीपुरवठा करण्यात येतो, परंतु उपरोक्त धरण क्षेत्रांत अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोरपणे नियोजन करता यावे याकरिता सिडकोकडून २७ जूनपासून २५ टक्के पाणीकपात करण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करत सिडकोला सहकार्य करावे, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

# जसखार येथे स्वस्त धान्य दुकानाचे उद्घाटन

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील जसखार येथे आशीर्वाद स्वयंसहायता समूह महिला बचत गट यांच्या वतीने सरकारमान्य स्वस्त धान्य दुकान सुरू करण्यात आले आहे. या दुकानाचे उद्घाटन गुरुवारी (दि. २३) जसखार ग्रामपंचायत सरपंच दामूशेठ घरत यांच्या हस्ते झाले.

या वेळी जसखार ग्रामपंचायत सदस्य जयवंत घरत, जयश्री म्हात्रे, योगिता ठाकूर, रिना भोईर, प्रतीक्षा ठाकूर, मोरेश्वर घरत, विजय भोईर, दीपक ठाकूर, तहसील कार्यालय बिरासदार, पंचायत समिती अधिकारी राम मदने, बचत गटाच्या सीआरपी प्रीती ठाकूर, आशिर्वाद स्वयंसहायता बचत गट अध्यक्ष रविता ठाकूर, सचिव श्रद्धा ठाकूर, खजिनदार, वैशाली ठाकूर, बचत गटाच्या सदस्य कीर्ती ठाकूर, शारदा म्हात्रे, देवयानी म्हात्रे, भारती तांडेल, सामाजिक कार्यकर्ते दिनानाथ ठाकूर, पी. टी. म्हात्रे आदी उपस्थित होते.

महिला बचत गटांनी पुढाकार घेऊन सरकारमान्य धान्य दुकान सुरू केले आहे. या सर्व महिलांचे मी कौतुक करतो. त्यांना यापुढील काळातही मी सहकार्य करेन, असे सरपंच दामूशेठ घरत या वेळी म्हणाले.



# केबीपी कॉलेजमध्ये राष्ट्रीय वाचन दिन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये राष्ट्रीय वाचन दिन (दि. १९ जून) झाला. महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग व प्रा. डॉ. एन. डी. पाटील नॉलेज रिसोर्स सेंटर यांच्या वतीने, राष्ट्रीय वाचन दिनानिमित्त एका व्याख्यानपर कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



प्रस्तुत कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली तर उपप्राचार्य व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे चेअरमन प्रा. सी. डी. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली तर उपप्राचार्या डॉ. राजेश्री घोरपडे यांच्या उपस्थितीत झाला. सदर कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून डॉ. आबासाहेब सरवदे उपस्थित होते.

प्रमुख वक्ते डॉ. आबासाहेब सरवदे यांनी उपस्थितांना वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी राष्ट्रीय वाचन दिनाची पार्श्वभूमी व मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व व उपयुक्तता विविध उदाहरणे, समर्पक दृष्टांत देऊन पटवून सांगितले. डॉ. सरवदे पुढे म्हणाले की, पोटाला जशी रोज अन्नाची गरज असते तशी बुद्धीला रोज वाचनाची गरज असते. बुद्धीला सतेज, तल्लख आणि विवेकशील ठेवण्या मध्ये वाचनाचा वाटा खूप मोठा आहे. बुद्धीचे खाद्यान्न वाचन आहे, म्हणून आपण रोज वाचले पाहिजे. वाचनाने व्यक्तिमत्त्व सुंदर, संपन्न आणि श्रीमंत बनते. पुस्तकातला विचार शांतीचा असो की क्रांतीचा असो त्यातून ऊर्जाच मिळत असते. ही ऊर्जा माणसाच्या जगण्याला सौदर्य आणि लढण्याला सामर्थ्य देत असते. म्हणून आपण सर्वांनी विविध प्रकारातील वाचन सातत्याने केले पाहिजे. डॉ. सरवदे यांनी वाचनाचा आणि व्यक्तिमत्त्व विकासाचा परस्परसंबंध काय आणि कसा आहे. तो उपस्थितांना उलगडून सांगितला आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. सी. डी. भोसले यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात ग्रंथाचे महत्व विशद केले. तसेच महाविद्यालयातील ग्रंथालयाकडून विद्यार्थ्यांना पुरवल्या जाणाऱ्या सोयी सुविधांचा आढावा घेतला.

प्रास्ताविक व प्रमुख वक्त्यांचा परिचय ग्रंथपाल मानसी रसाळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अर्चना चव्हाण यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. सुजाता पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विभागाचे अधिष्ठाता, प्राध्यापक, ग्रंथालय सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., अ‍ॅट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, अ‍ॅस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✻ E-mail : ramprahar@gmail.com ✻ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by Krishna Changu Thakur on behalf of Malhar Network Pvt. Ltd. and Printed at Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra and published from Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale

# धाटावमधील वायुप्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर कडक कारवाई करावी

## अमित घाग यांचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला निवेदन

**धाटाव : प्रतिनिधी**

वारंवार वायूप्रदूषण करणाऱ्या धाटाव औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी भाजयुवामोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष अमित घाग यांनी शुक्रवारी (दि. २४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली.


(छाया : जितेंद्र जाधव)

रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक रासायनिक कारखाने आहेत. मोसमी पावसाचा फायदा घेऊन यातील काही रासायनिक कारखाने वायुप्रदूषण करीत आहेत. या वायूप्रदूषणाने गेल्या काही दिवसापासून परिसरातील नागरिक व कामगार हैराण झाले आहेत.

मोठ्या प्रमाणावर वायुप्रदूषण झाल्यामुळे गुरुवारी (दि. २३) धाटाव, तळाघर, लांढर, बोरघर, निवी, वरसे, वाशी, रोहा शहर, उडदवणे, रोठ, महादेववाडी परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वारंवार वायूप्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कडक कारवाई करावी, तसेच धाटाव औद्योगिक वसाहतीमध्ये कायमस्वरूपी अधिकारी द्यावा, अशी मागणी अमित घाग यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आर. एस. कामत व माने यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

> **वायूप्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्यासंदर्भात भाजयुवामोर्चाने निवेदन दिले आहे. त्याबाबत वरिष्ठांना कळविले जाईल तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कारखान्यांवर कडक कारवाई करण्यात येईल.**
> **-आर. एस. कामत, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई**

# नेरळ येथील खुनाची उकल; दोन युवकांना अटक

(छाया : संतोष पेरणे)




**कर्जत : बातमीदार**

नेरळ-कळंब रस्त्यावर २८मे रोजी जळालेला मृतदेह आढळून आला होता. या मृतदेहाची ओळख पटविण्यात पोलिसांना यश आले असून त्यांनी या प्रकरणी दोघाजणांना अटक केली आहे. दिनेश केवट आणि मोहमद अहमद हुसेन असे पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींची नावे असून, त्यांनी पैशांच्या वादातून हरेश लोट याची हत्या करून, त्याचा मृतदेह कळंब-नेरळ रस्त्यावर नेवून जाळून टाकला असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे.

बदली ड्रायव्हर म्हणून काम करणारा हरेश लोट हा आपल्या आई सोबत कर्जत मुद्रे येथे राहत होता. गावाच्या वेशीवरील भंगार विक्रेता दिनेश राममिलन केवट आणि मोहमद अहमद हुसेन यांच्याकडे तो खंडणी सारखी पैशाची मागणी करीत असे. ते दोघेदेखील त्याला काही पैसे देत होते. २८ मे रोजी पैशांच्या कारणावरून दारूच्या नशेत असलेल्या हरेश लोट याच्या बरोबर दिनेश केवट आणि मोहमद यांची झटापट झाली. त्यावेळी दिनेश केवट याने दुकानातील हत्यार डोक्यात घालून हरेशला ठार मारले. रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास दुरुस्तीसाठी असलेली एका गाडीमध्ये हरेशचा मृतदेह भरून दिनेश व महमद यांनी कळंब-नेरळ रस्त्यावरी ओसाड जागेत नेला. तेथे पेट्रोल व गवत टाकून मृतदेह पेटवून दिला. व तेथून पुन्हा कर्जत गाठले.

जळालेल्या मृतदेहाची ओळख पटविणे हे पोलिसांपुढे आव्हान होते. मात्र मृतदेहावरील अर्धवट जळालेल्या अंडरवेअरवरून नेरळ पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक आरोपीपर्यंत पोचले. अंडरवेअरवरून जळालेला मृतदेह कर्जत मुद्रे येथील नानामास्तर नगर भागातील बदली गाडीचालकाचा असल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान, कर्जत पोलीस ठाण्यात १६ जून रोजी हरेश पांडुरंग लोट हा तरुण हरवलेला आहे, अशी तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर पोलीस पथकाने २४ जून रोजी या प्रकरणातील आरोपींना ताब्यात घेतले. आरोपी दिनेश केवट आणि मोहमद अहमद हुसेन (सध्या रा. कर्जत, मुळ रा. सिद्धार्थनगर उत्तरप्रदेश) यांना न्यायालयाने २८ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जतचे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कदम आणि नेरळ पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक श्रीकांत काळे, महेश धोंडे यांच्या पथकाने केले.

## रोहा भुवनेश्वरमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील वरसे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील भुवनेश्वर परिसरात भटक्या कुत्र्यांची प्रचंड दहशत असल्याने नागरिक रस्त्यावरुन जाताना सावधानता बाळगत आहे. वरसे ग्रामपंचायतीने या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची आवश्यकता आहे.

भुवनेश्वर परिसरात मोठ्या प्रमाणात भटकी कुत्री रस्त्यांवर वावरताना दिसतात. मॉर्निंग वॉकसाठी जाणाऱ्यांना त्यांचा त्रास सहन करावा लागतो. भुवनेश्वरमधील शंकर मंदिरामागे असलेल्या कचरा डेपोमध्ये खाद्याच्या शोधात मोठ्या प्रमाणात भटकी कुत्री येतात. तेथे खाद्य न मिळाल्यास डुकरे, दुभती जनावरे यावर ते हल्ले करताना दिसतात. गेल्या महिन्यात या कुत्र्यांनी एका गाईच्या वासरावर हल्ला करून त्याला जखमी केले होते. तर गेल्या आठवड्यात मॉर्निंगवॉकसाठी गेलेल्या एका व्यक्तीला कुत्र्याने चावा घेतला होता. त्यामुळे या परिसरात भटक्या कुत्र्यांची दहशत निर्माण झाली आहे.

भुवनेश्वर हा दाटवस्तीचा परिसर असून येथील रस्त्यावर नेहमीच वर्दळ असते. मॉर्निंगवॉकला व संध्याकाळी फिरण्यासाठी या परिसरातून मोठ्या प्रमाणात नागरिक निवी अथवा त्यापुढे जात असतात, परंतु भटक्या कुत्र्यांमुळे या नागरिकात भीती निर्माण झाली आहे.

## कशेडी घाट होतोय अपघातप्रवण क्षेत्र

### ■ तांत्रिक बिघाडामुळे आठवड्यात दोन वाहनांचे नुकसान

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटामध्ये चौपदरीकरणाचे काम बहुतांशी पूर्णत्वास जात आहे. मात्र पावसाळ्यामुळे अवजड वाहनांना वेगनियंत्रण करताना अपघात होत असून वाहनांमध्ये तांत्रिक दोष निर्माण होत असल्याचेही दिसून आले आले आहे. गेल्या आठवड्यात चोळई आणि भोगाव येथे दोन वाहनांचे नुकसान झाल्याने कशेडी घाट पावसाळ्यामध्ये अपघातप्रवण क्षेत्र होत असल्याचे दिसून येत आहे.



(छाया : शैलेश पालकर)

कशेडी घाटाच्या प्रारंभी चोळई (ता. पोलादपूर) येथे सुंदरराव मोरे महाविद्यालयासमोर १५ जून रोजी सायंकाळच्या सुमारास खेडकडून मुंबईकडे जाणारा एक कंटेनर (एमएच-४६,एएफ-२९४७) महामार्गाच्या एकाबाजूला जाऊन कलंडला. यामुळे कंटेनरमधील रसायन महामार्गाच्या खाचखळग्यातून वाहू लागले. कंटेनरचेही मोठे नुकसान झाले. २० जून रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास कशेडी घाट उतरताना भोगाव या गावाच्या हद्दीमध्ये एका कंटेनरच्या ड्रायव्हर केबिनमधील वायरिंगमध्ये बिघाड झाला तसेच पुढील बाजूच्या टायर्ससह केबिननेही पेट घेतल्याने झालेल्या अपघातात या कंटेनरचे प्रचंड नुकसान झाले.

वाहनावर नियंत्रण ठेवताना वाहनामध्ये तांत्रिक बिघाड होऊन अपघात होण्याच्या एकाच आठवड्यातील दोन घटनांमुळे कशेडी घाट पुन्हा अपघातप्रवण क्षेत्र होऊ पाहात असल्याचे दिसून येत आहे.

## डोक्यात लोखंडी शिग मारल्याने एक जखमी

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील नागलवाडी गावाच्या हद्दीत एका व्यक्तीला त्याच्या राहत्या घरी जावून शुक्रवारी (दि. २३) मध्यरात्री दोघांनी डोक्यात लोखंडी शिग मारून जखमी केले. या प्रकरणी दोन आरोपींविरोधात महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रताप सुंदर शेट्टी (रा. आयोध्या अपार्टमेंट, नागलवाडी) यांच्या घरी शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास सुशांत श्रीकांत लोहार (रा. सांगली) आणि दुसरा अनोळखी इसम आला. त्या दोघांनी शेट्टी यांना घराबाहेर बोलावून घेतले आणि काही कारण नसताना त्यांच्या डोक्यात लोखंडी शिग मारली. यामध्ये शेट्टी गंभीर जखमी झाले.

## नेरळ रेल्वेस्थानकातील लिफ्ट ३० जूनपासून होणार सुरू

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

नेरळ रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक दोनवर बसवण्यात आलेले उदवाहन (लिफ्ट) प्रवाशांसाठी येत्या ३० जूनला सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मध्य रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली. यापुर्वी हे उदवाहन १० जून रोजी कार्यान्वीत करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते, मात्र ते सुरू झाले नव्हते.

नेरळ रेल्वे स्थानकात दोन फलाटांना जोडण्यात आलेला पादचारी पूल हा प्रवाशांना विशेषत: ज्येष्ठ व अपंग नागरिकांना चढ-उतार करण्यासाठी खूप त्रासदायक होत असल्याने स्थानकात उदवाहन किंवा सरकता जिना बसवावा अशी मागणी पुढे येत होती. त्या अनुषंगाने रेल्वे प्रशासनाकडून नेरळ स्थानकातील फलाट क्रमांक दोनवर उदवाहन बसवण्यात आले आहे. मात्र काही तांत्रिक कामासाठी हे उदवाहन सुरू करण्यात आले नव्हते. ते १० जून रोजी सुरू करण्यात येणार असल्याची माहिती त्यावेळी मध्य रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली होती.ही तारीख उलटून गेल्याने सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारल्यावर मुंबई श्री छत्रपती टर्मिनसचे सिनियर डीसीएम गौरव झा यांनी आता लेखी पत्रक काढून ३० जून रोजी हे उदवाहन प्रवासांच्या सेवेत सुरू करण्यात येणार असल्याचे कळविले आहे.

> **नेरळ रेल्वेस्थानकातील उदवाहन जोपर्यंत सुरू होत नाही तोपर्यंत आपण पुरावा सुरूच ठेवणार आहोत.**
> **-पंकज मांगीलाल ओसवाल, सामाजिक कार्यकर्ते, कर्जत**

## माथेरानमध्ये तरुणांकडून स्वच्छता मोहीम

**कर्जत : बातमीदार**



पर्यटकांनी माथेरान परिसरात फेकून दिलेल्या प्लास्टिक बाटल्या आणि कचरा येथील पर्यावरणप्रेमी राकेश कोकळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गोळा करून माथेरानचा काही भाग प्लास्टिकमुक्त करण्याचे काम केले आहे.

पर्यटन हंगामात हजारो पर्यटक माथेरानला भेट देतात. हे पर्यटक माथेरान आणि परिसरातील जंगलात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक आणि प्लास्टिकच्या बॉटल्या टाकून देतात. पर्यावरणप्रेमी राकेश कोकळे व त्यांचे सहकारी दरवर्षी स्वच्छता मोहीम राबवून हा कचरा गोळा करतात.

सध्या माथेरानचा पर्यटन हंगाम संपला आहे. या हंगामातही पर्यकांनी परिसरातम मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक बाटल्याआणि प्लास्टिकचा कचरा फेकून दिला होता. माझं गावं माझं पर्यावरण या संकल्पनेतून राकेश कोकळे यांनी माथेरानचे अधीक्षक दिक्षांत देशपांडे, प्रकाश मोरे, किशोर कासुरडे, दीपक रांजणे, राजू जाबरे, गणेश बिरामने, अर्जून जानकर, अनिकेत कोकरे, पंकज कोकरे, जितेश कदम, अनंता ओखारे, विलास चव्हाण, शुभम सकपाळ, अक्षय नाईकरे, करण जानकर आदी सहकाऱ्यांच्या मदतीने शारलोट लेक परिसरातील जंगलात फिरून सुमारे २७ गोणी म्हणजे ७ ते ८हजार बिस्लरी बॉटल्स तसेच प्लास्टिक कचरा गोळा केला. व माथेरानचा काही भाग प्लास्टिकमुक्त केला आहे.



## खालापुरात वात्सल्य शिबिर

**खालापूर : प्रतिनिधी**

कोरोनामध्ये दोन्ही पालकांचे निधन होऊन अनाथ झालेल्या बालकांना व कुटूंबातील कर्त्यापुरुषाचे निधन होवून एकल, विधवा झालेल्या महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी मिशन वात्सल्य योजने अंतर्गत खालापूर तहसील कार्यालय येथे कागदपत्र तपासणी आयोजित करण्यात आली होती. या वेळी मिशन वात्सल्य योजनेच्या लाभार्थ्यांकरिता खालापूर तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयामार्फत १२ वर्षांवरील नागरिकांचे लसीकरण आणि वैद्यकीय तपासणी शिबिरही घेण्यात आले.

खालापूर तहसीलदार तथा मिशन वात्सल्य समितीचे तालुका अध्यक्ष आयुब तांबोळी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या शिबिराला समितीचे सदस्य उपस्थित होते. तालुक्यातील लाभार्थी या शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## 'गाते रहो गुनगुनाते रहो' संगीत मैफल

### ■ जुन्या जमान्यातील गीतांनी श्रोते झाले मंत्रमुग्ध

**कर्जत : प्रतिनिधी**

ज्ञानकमल शिक्षण संस्थेच्या वतीने श्री विद्या वाणी म्युझिक ग्रुपच्या गायकांनी 'गाते रहो गुनगुनाते रहो' या संगीत मैफलीमध्ये जुन्या जमान्यातील गीते सादर करून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

या सुरेल मैफलीचे आयोजन डॉ. काशीनाथ घाणेकर सभागृहात करण्यात आले होते. संस्थेच्या अध्यक्षा प्रा. मनिषा बैकर यांनी दीपप्रज्वलन केले. संयोजक बाहुबली मेहता, संजीव जैन, मनीषा सुर्वे, सचिव नामदेव बैकर, दिलीप घेवारे, प्रमोद पालांडे आदी या वेळी उपस्थित होते. प्रा. बैकर यांनी ज्ञानकमल शिक्षण संस्था राबवित असलेल्या कर्जत, अंबरनाथ तालुक्यात शैक्षणिक, सामाजिक उपक्रमांबाबत माहीती दिली.

सरस्वती वंदनेने संगीत मैफलीला प्रारंभ झाला. शीतल बोपलकर, ऋषी सराफ, संजीव जैन, दिलीप घेवारे, प्रमोद पालांडे, दीपाली जैन, स्नेहल गोधा, अनिकेत जैन, जितेंद्र बाकलीवला आदी गायकांनी गीते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. अतिष अवस्थी यांनी सूत्रसंचालन केले.

# आषाढी वारी : रिंगण सोहळ्यातील सुवर्णध्वजाचा मान मुरूडच्या भोपळे दिंडीला


(छाया : संजय करडे)

**मुरुड : प्रतिनिधी**

पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शनासाठी वारकरी आळंदीहून माउलींच्या पालखीसोबत प्रस्थान करतात. या वारीत श्रीवर्धन आणि मुरुड तालुक्यातील ३०० वारकरी (भोपळे दिंडी क्र.१४) दरवर्षी सहभागी होतात. वारीतील रिंगण सोहळ्यात धावणाऱ्या घोड्यावरील सुवर्णध्वजाचा मान मुरूड येथील भोपळे दिंडीचा आहे.

झेंडकरी देविदास महाराज लोखंडे, दिंडीचे अध्यक्ष माऊली महाराज लोखंडे, भाई मिठागारी, अनंता पाटील, दिपेश परवे (सर्व रा. मुरूड) आदी भोपळे दिंडीचे नियोजन करतात. ही दिंडी नुकताच मुरुडहून रवाना झाली आहे.

वारीतील रिंगण सोहळ्यात अश्वांची पूजा झाल्यानंतर मुरूडच्या भोपळे दिंडीच्या जरीपटक्याच्या ध्वजाने रिंगणाला दोन प्रदक्षिणा पूर्ण केल्या जातात. त्यानंतर स्वाराचा अश्व रिंगणासाठी सोडण्यात येतो. या रिंगण सोहळ्यात धावणाऱ्या घोड्यावर मुरूड येथील भोपळे दिंडीचा सुवर्णध्वज असतो. या वेळी लाखो भाविक माऊलीऽ माऊलीऽऽ नामाचा जयघोष सुरू करतात. हा रिंगण सोहळा मोठ्या उत्साही व भक्तीमय वातावरणात पार पडतो.

वारीतील रिंगण सोहळ्यात धावणाऱ्या घोड्यावरील सुवर्ण ध्वजाचा मान मुरूड येथील भोपळे दिंडीचा असतो, ही गोष्ट अनेकांना माहिती नाही. मात्र सुवर्ण ध्वजाचा मान भोपळे दिंडीला मिळत असल्याबद्दल रायगडातील वारकऱ्यांत समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचे कार्यालय**
**शुक्रतारा बिल्डींग, कामतआळी, तळ मजला, सत्कार प्रेससमोर, ता. अलिबाग, जि. रायगड**
दुरध्वनी क्रमांक/फॅक्स क्र. ०२१४१-२२२०१३ ई-मेल camofaraigad@gmail.com

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्जदाराच्या नावे एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण करणेसाठी जाहीर नोटीस**

अर्जदार यशोगंगा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. टिळक रोड, ता. पनवेल, जि. रायगड यांनी गैरअर्जदार (१) श्री. अशोक गंगाधर पुराणीक (जागा मालक), रा. दुसरा मजला, अंबा अपार्टमेंट, शिवाजी पार्क, मुंबई १६, (२) आनंद गंगाधर पुराणिक, रा. ४०३, सिमला हाऊस, नेपीयनसी रोड, मुंबई २६, (३) श्री. अतुल गंगाधर पुराणिक, रा. विजया सदन, सायन (प.), मुंबई २२ (४) श्री. महादेव विष्णु पुराणिक, रा. ए-७, विजया सदन, सायन (प.), मुंबई २२ (५) मे. केदार एन्टप्रायझेस तर्फे भागीदार श्री. शंकर दत्तात्रेय जोशी, रा. १०२, आशा अपार्टमेंट, फडके रोड, डोंबिवली (पू.), ता. कल्याण, जि. ठाणे यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे मानिव अभिहस्तांतरण करुन मिळणेबाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

मौजे पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दितील सिटी सर्वे नं. ६४५/१, यशोगंगा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. टिळक रोड, ता. पनवेल, जि. रायगड क्षेत्रफळ ९६३.३४ चौ.मी.

सदर प्रकरणी दि. २२/०६/२०२२ रोजीच्या सुनावणी वेळी अर्जदार यांनी निवेदन केले की गैरअर्जदार क्र. ४ हे मयत असून त्यांचे वारस ज्ञात नसल्याने वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात यावी. उर्वरित सर्व गैरअर्जदारांना नोटीस बजावणी होऊनही ते उपस्थित राहीले नाहीत अगर त्यांनी लेखी म्हणणे दाखल केले नाही. सबब सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे अर्जाबाबत त्यांचे म्हणणे सादर करणेसाठी दि. २५/०७/२०२२ रोजी वेळ दुपारी ३.०० वाजता आवश्यक त्या कागदपत्रांसह सुनावणीस उपस्थित राहावे, सदर रोजी आपण उपस्थित न राहिल्यास अथवा आपले म्हणणे दाखल न केल्यास आपले काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून आपले गैरहजेरीत एकतर्फी कामकाज करुन सदर प्रकरणी उचित निर्णय करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक २२/०६/२०२२**

शिक्का

सही/-
**(डॉ. सोपान शिंदे)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

रणजी चषक स्पर्धा

# मुंबईविरुद्धच्या फायनलमध्ये मध्य प्रदेशची पकड मजबूत



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

रणजी ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात शनिवारी (दि. २५) चौथ्या दिवशी मध्य प्रदेशने सामन्यावरील आपली पकड अजून मजबूत केली. मुंबईने पहिल्या डावात केलेल्या ३७४ धावांच्या प्रत्युत्तरात खेळताना मध्य प्रदेशने पहिल्या डावात ५३६ धावा केल्या. त्यानंतर मुंबईच्या दुसऱ्या डावात दिवसाखेर २ बाद ११३ धावा झाल्या आहेत.

मध्य प्रदेशने तिसऱ्या दिवसाखेर ३ बाद ३६८ धावांपर्यंत मजल मारली होती. चौथ्या दिवशी मध्य प्रदेशच्या रजत पाटीदारने आपल्या अर्धशतकाचे रूपांतर शतकात केले. त्याच्या या शतकी खेळीमुळे मध्य प्रदेशने आपली पहिल्या डावातील आघाडी शतकाच्या पार गेली. यानंतर सारांश जैनने ५७ धावांची अर्धशतकी खेळी केली. अखेर मुंबईने मध्य प्रदेशचा पहिला डाव ५३६ धावात संपुष्टात आणला. मध्य प्रदेशने पहिल्या डावात १६२ धावांची आघाडी घेतली.

तत्पूर्वी मध्य प्रदेशचा सलामीवीर यश दुबे (१३३) शुभम शर्मा (११६) यांनी तिसऱ्याच दिवशी शतकी खेळी करीत संघाला मजबूत स्थिती नेले होते. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला त्यावेळी मध्य प्रदेशने ३ बाद ३६८ धावा केल्या होत्या. मुंबईवर आघाडी घेण्यासाठी फक्त सहा धावांची गरज होती. तिसऱ्या दिवसाखेर रजक पाटीदार अर्धशतक करून नाबाद होता.

चौथ्या दिवसाखेर मुंबईच्या दुसऱ्या डावात २ बाद ११३ धावा झाल्या आहेत. सलामीवीर पृथ्वी शॉ ४४ धावा करून बाद झाला, तर हार्दिक तामोरेने २५ धावा केल्या. अरमान जार्फ ३० आणि सुवेद परकार ९ धावा करून खेळपट्टीवर आहेत. मध्य प्रदेशकडून कुमार कार्तिकेय व गौरव यादव यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. मुंबई अजूनही ४९ धावांनी मागे आहे.

# कुमारी गट वर्ल्डकपचे वेळापत्रक जाहीर

## भारतासमोर बड्या संघांचे कडवे आव्हान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

'फिफा' कुमारी (१७ वर्षांखालील) गट विश्वचषक फुटबॉल स्पर्धेची कार्यक्रमपत्रिका जाहीर करण्यात आली असून भारताला 'अ' गटात अमेरिका, ब्राझील आणि मोरोक्कोचे कडवे आव्हान असणार आहे.

भारतात होणाऱ्या या विश्वचषक स्पर्धेचे आयोजन ११ ते ३० ऑक्टोबरदरम्यान भुवनेश्वर, गोवा आणि नवी मुंबई या तीन शहरांत होणार आहे. एकूण १६ संघांची विभागणी ही चार गटांत करण्यात आली आहे.

भारताची ११ ऑक्टोबरला पहिल्या लढतीत अमेरिकेशी गाठ पडणार आहे. भारताचा दुसरा सामना १४ ऑक्टोबरला मोरोक्कोविरुद्ध, तर १७ ऑक्टोबरला ब्राझीलविरुद्ध होणार आहे.




**संघांची गटवारी**

गट-अ : भारत, अमेरिका, मोरोक्को, ब्राझील;
गट-ब : जर्मनी, नायजेरिया, चिली, न्यूझीलंड;
गट-क : स्पेन, कोलंबिया, मेक्सिको, चीन;
गट-ड : जपान, टान्झानिया, कॅनडा, फ्रान्स.




# ...म्हणून आदिल राशिद भारताविरुद्ध खेळणार नाही

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा दिग्गज फिरकी गोलंदाज आदिल राशिद भारताविरुद्ध एकदिवसीय आणि टी-२० मालिका खेळणार नाही. या काळात राशिद हज यात्रेला जाणार आहे. त्यासाठी त्याला इंग्लंडच्या क्रिकेट नियामक मंडळाने (ईसीबी) आणि यॉर्कशायर क्लबने रजा मंजूर केली आहे.



गेल्या वर्षी कोविड-१९मुळे भारतीय संघाने इंग्लंडचा दौरा अर्धवट सोडला होता. तो पूर्ण करण्यासाठी भारतीय संघ पुन्हा इंग्लंडमध्ये दाखल झाला आहे. १ जुलै रोजी सुरू होणाऱ्या एजबस्टन कसोटीपासून या दौऱ्याला सुरुवात होईल. सध्या भारतीय संघ लिसेस्टरशायर संघाविरुद्ध चार दिवसीय सराव सामना खेळण्यात व्यस्त आहे.

जुलै महिन्यात राशिद हज यात्रेसाठी मक्केला जाणार आहे. या दरम्यान भारत आणि इंग्लंड यांच्यात तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. राशिद सध्या मर्यादित षटकांच्या क्रिकेटमधील सर्वोत्तम फिरकी गोलंदाजांपैकी एक आहे. त्याने विराट कोहली आणि रोहित शर्मासारख्या दिग्गजांना आपल्या गोलंदाजीने खूप त्रास दिला आहे.

राशिदच्या अनुपस्थितीत इंग्लंडची फिरकी गोलंदाजी कमकुवत होईल. त्याच्या जागी इंग्लंड कसोटी संघाचा भाग असलेल्या जॅक लीचची निवड होऊ शकते.

# आठ वर्षांच्या मुलाने १८ मिनिटांत पार केली यमुना नदी

**प्रयागराज : वृत्तसंस्था**

प्रयागराजमधील शिवांश मोहिले नावाच्या या आठ वर्षांच्या मुलाने यमुना नदीच्या पाण्यात उतरून विक्रम केला आहे. त्याने अवघ्या १८ मिनिटांत यमुना नदी पार केली. अशी कामगिरी करणारा शिवांश पहिलाच मुलगा ठरला आहे. यापूर्वी आराध्य श्रीवास्तव नावाच्या मुलाने २२ मिनिटांमध्ये यमुना पार केली होती.

शिवांश सध्या टागोर पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता दुसरीमध्ये शिकतो. याशिवाय नवजीवन जलतरण क्लबमध्ये तो पोहण्याचे प्रशिक्षणही घेतो. त्याने आपल्या प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मीरापूर सिंधू सागर घाट (काकरा घाट) येथून सकाळी ६ वाजता पाण्यात उडी मारली होती. सहा वाजून १८ मिनिटांनी तो नदीच्या दुसऱ्या टोकाला पोहचला.

विम्बल्डन टेनिस स्पर्धा

# जोकोव्हिच, नदालची बिगरमानांकित खेळाडूंशी सलामी

**विम्बल्डन : वृत्तसंस्था**

आगामी विम्बल्डन टेनिस स्पर्धेत अग्रमानांकित सर्बियाचा नोव्हाक जोकोव्हिच आणि २२ ग्रँडस्लॅम विजेत्या स्पेनच्या राफेल नदालची पहिल्या फेरीत बिगरमानांकित खेळाडूंशी लढत असेल, तर पुनरागमन करणाऱ्या सेरेना विल्यम्सची सलामीची लढत ११३व्या मानांकित हार्मनी टॅनशी होईल.

विम्बल्डन टेनिस स्पर्धेची कार्यक्रमपत्रिका शुक्रवारी जाहीर करण्यात आली. यानुसार पुरुष एकेरीत जोकोव्हिच पहिल्या फेरीत कोरियाच्या सोनवो क्वोनचा सामना करेल, तर नदालसमोर अर्जेटिनाच्या फ्रान्सिस्को सेरुन्डोलोचे आव्हान असेल. जोकोव्हिचने उपांत्यपूर्व फेरीत आगेकूच केली, तर तिथे त्याची गाठ पाचव्या मानांकित स्पनेच्या कार्लो झ अल्कराझशी पडू शकते. हा अडथळा त्याने पार केल्यास उपांत्य फेरीत त्याचा सामना तिसऱ्या मानांकित नॉर्वेच्या कॅस्पर रुडशी होऊ शकतो. या फेरीतही त्याने विजय मिळवल्यास अंतिम फेरीत त्याच्यासमोर नदालचे आव्हान असेल.

नदालने उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारल्यास तिथे त्याचा सामना सहाव्या मानांकित कॅनडाच्या फेलिक्स ऑगर-अॅलिसिमेशी होऊ शकतो. या फेरीत जिंकल्यास उपांत्य फेरीत त्याच्यासमोर ग्रीसच्या स्टेफानोस त्सित्सिपासचे आव्हान असू शकते.

स्पर्धेत थेट प्रवेशिकेद्वारे आलेल्या सेरेनाची पहिली लढत फ्रान्सच्या हार्मनी टॅनविरुद्ध आहे. तिने उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारल्यास स्पेनच्या चौथ्या मानांकित पॉला बाडोसाची गाठ पडू शकते. हा सामना जिंकल्यास सेरेनाला पोलंडच्या अग्रमानांकित इगा श्वीऑनटेकचा सामना करावा लागेल.

# स्पेनचा फुटबॉलपटू खेळणार विराट कोहलीच्या संघात

## एफसी गोवाने केले करारबद्ध

**पणजी : वृत्तसंस्था**

भारताचा स्टार क्रिकेटपटू विराट कोहलीची सहमालकी असलेला फुटबॉल संघ एफसी गोवाने स्पेनचा प्रतिभावंत फुटबॉलपटू अल्वारो वॅझकेझ याला दोन वर्षांसाठी करारबद्ध केले आहे. त्यामुळे २०२४च्या हंगामापर्यंत अल्वारो गोव्याच्या ऑरेंज जर्सीमध्ये खेळताना दिसेल.

क्रिकेटवेड्या आपल्या देशात आता हळूहळू फुटबॉललादेखील ओळख मिळण्यास सुरुवात झाली आहे. फुटबॉलची लोकप्रियता वाढवण्यासाठी अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) आयपीएलच्या धर्तीवर इंडियन सुपर लीग (आयएसएल) स्पर्धेची सुरुवात केली आहे. या स्पर्धेमुळे विविध देशांतील प्रतिभावान फुटबॉलपटू भारतामध्ये येऊन फुटबॉल खेळताना दिसतात.

स्ट्रायकर असलेला अल्वारो यापूर्वी केरळ ब्लास्टर्स या संघाकडून खेळत होता. आयएसएलच्या २०२१-२२ या हंगामामध्ये आठ गोल करून त्याने केरळच्या संघाला स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पोहचविण्यात मोलाचा वाटा उचलला होता. याशिवाय त्याने दोन गोल करण्यातही (असिस्ट) मदतही केली होती. हा त्याचा पहिलाच आयएसएल हंगाम होता. आता तो एफसी गोवा संघाशी करारबद्ध झाला आहे. यामुळे मला खूप आनंद होत असल्याचे वॅझकेझने सांगितले.







